दैनिक
# लोकविजय
संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर

## मी दिशा सालियान यांना कधीही भेटलेलो नाही; आदित्य ठाकरेंनी सोडले मौन

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- दिवंगत अभिनेता सुशांतसिंह राजपूत याची व्यवस्थापक दिशा सालियन हिच्या मृत्यूप्रकरणात एफआयआरमध्ये आदित्य ठाकरेंचं नाव असल्याचा दावा सतिश सालियन यांनी केला आहे. त्यामुळे राज्याच्या राजकारणात चर्चा सुरू झाली असून आदित्य ठाकरेंना लक्ष्य केलं जात आहे. याप्रकरणात आदित्य ठाकरे यांनी यापूर्वीही फारशी वाच्यता केलेली नाही. मात्र, आता त्यांनी यावर मौन सोडलं आहे. त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत याबाबत मोठा खुलासा केला आहे.

'अफवांचा धुरळा उडवणं बंद करण्यासाठी पुन्हा एकदा फक्त आणि फक्त तथ्य सांगतो!', असं म्हणत आदित्य ठाकरे म्हणाले, 'मी दिशा सालियान यांना कधीही भेटलेलो नाही किंवा त्यांच्याशी माझी ओळखही नव्हती. राजकीय हेतूने, वैयक्तिक द्वेषापायी, चारित्र्यहनन करण्याच्या हेतूने काही लोकांकडून गेल्या ६ वर्षांपासून वारंवार ह्या दुर्दैवी घटनेशी कुठलाही पुरावा वा संबंध नसतानाही माझं नाव जोडण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न सुरू आहे.' 'कुठलंही तथ्य आणि सत्य नसलेलं हे सततचं खोटं कॅंपेन दुर्दैवी आहे. बोंबाबोंब करून केल्या जाणाऱ्या टिव्ही चॅनल्सवरच्या खोट्या चर्चा आणि मिडिया ट्रायल्स सत्य बदलू शकत नाहीत. अधिकृत यंत्रणांना कुठल्याही व्यत्ययाशिवाय, राजकीय हस्तक्षेपाशिवाय, चारित्र्यहननाशिवाय आणि निःपक्षपातीपणे पुन्हा एकदा नव्याने ही चौकशी करू द्या. परत एकदा सांगतो, ज्यांना वाटत असेल की अशा चारित्र्यहननाच्या आणि खोट्या प्रचाराच्या मार्गाने तुम्ही आम्हाला शांत बसवू शकाल तर तो तुमचा भ्रम आहे. सत्यासाठी, अन्यायाविरुद्ध, देशवासीयांना सोबत घेऊन आमचा लढा सुरुच राहील!', असं आदित्य ठाकरे म्हणाले.

(वर्ष ६५ वे अंक २३३) पोस्टाचा परवाना नं./अे/आर/ए.जी.डी-०७/२०२५ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) गुरुवार, दि.१७ सप्टेंबर २०२६ (पाने ४) (किंमत २ रूपये)

# मनोज जरांगे पाटील आंदोलनावर ठाम

## रोखल्यास मराठ्यांना मुंबईत बोलावणार; सरकारला पुन्हा इशारा

बीड दि.१६ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणाच्या मागणीवरून मनोज जरांगे पाटील यांनी आज पत्रकार परिषद घेत सरकारला पुन्हा एकदा इशारा दिला आहे. १८ सप्टेंबरला मुंबईकडे जाणार असून मला मुंबईत येण्यापासून रोखण्याचा प्रयत्न केला, तर मराठ्यांना मुंबईत बोलावू, असा इशारा जरांगे यांनी दिला. दरम्यान, 'मुंबईत येऊ देणार नाही' असे म्हणणाऱ्या सरकारमधील मंत्र्यांनी आपले नाव जाहीर करावे, अशी मागणीही त्यांनी केली. आजच्या ऐवजी मी उद्या दुपारी १ नंतर मुंबईला जाणार आहे, अशी माहिती जरांगे पाटलांनी पत्रकार परिषदेतून दिली.



सरकारकडून पाठवण्यात आलेल्या ड्राफ्टवर सध्या चर्चा सुरू आहे. हैदराबाद गॅझेटनुसार मराठ्यांच्या नावांच्या नोंदी सापडल्याचा दावा जरांगे यांनी केला. या नोंदींच्या आधारे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू करावी, तसेच ९ सप्टेंबरच्या जीआरप्रमाणे हैदराबाद गॅझेटचा सुधारित जीआर तातडीने काढावा, अशी मागणी त्यांनी केली.

सरकारमधील काही मंत्र्यांनी आपल्या भाषेबाबत नाराजी व्यक्त केल्याचे पत्रकारांनी सांगितल्यानंतर जरांगे यांनी संबंधित मंत्र्यांवर सवाल उपस्थित केला. 'मुंबईत येऊ देणार नाही' असे म्हणणाऱ्या मंत्र्याचे नाव जाहीर करावे. नाव न सांगता अशा प्रकारची वक्तव्ये करण्याला अर्थ नाही, असे ते म्हणाले.

'गेल्या तीन वर्षांपासून माझी भाषा सरकारला चांगली लागत होती का?' असा प्रतिप्रश्नही जरांगे यांनी केला. आपण गेल्या काही वर्षांपासून सरकारशी संवाद साधत असताना आपल्या भाषेबाबत मंत्रिमंडळात चर्चा का झाली नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. काही मंत्र्यांच्या भूमिकेमुळे परिस्थिती बिघडली असेल, तर त्याचीही मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा व्हायला हवी होती, असे ते म्हणाले.

मराठा समाजाला सरकारकडून फसवले जात असल्याच्या आरोपांवर बोलताना जरांगे यांनी शिंदे समिती आणि हैदराबाद गॅझेटच्या प्रक्रियेचा मुद्दा उपस्थित केला. राज्यात आयोजित करण्यात येणाऱ्या शिबिरांचा उद्देश जुन्या नोंदी शोधणे आणि त्याआधारे प्रमाणपत्रांचे वाटप करणे हा असल्याचे त्यांनी सांगितले.

शिंदे समितीच्या जीआरमध्ये भूमी अभिलेख, न्यायालये, तुरुंग, संस्थान, देवस्थान तसेच इतर जुन्या नोंदी शोधण्याचा उल्लेख असल्याचा दावा त्यांनी केला. त्यामुळे शिबिरांचा उद्देश काय आहे, हे सांगण्यापूर्वी संबंधित जीआर वाचावा, असे जरांगे म्हणाले.

सरकारकडून मराठा समाजाच्या १३ पैकी १२ मागण्या मान्य झाल्याचा दावा केला जात असल्याच्या प्रश्नावर जरांगे यांनी आक्षेप घेतला. हैदराबाद गॅझेटनुसार प्रमाणपत्रेच मिळत नसतील किंवा त्या प्रमाणपत्रांना वैधता मिळत नसेल, तर मागण्या मान्य झाल्याचा उपयोग काय, असा सवाल त्यांनी केला.

**जरांगेंची प्रकृती खालावली**

पाटोद्यात मनोज जरांगे पाटील यांच्या तब्येतीची तपासणी वैद्यकीय पथकाने केली. जरांगेंचा रक्तदाब आणि साखरेची पातळी कमी झाल्याची माहिती बीड जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सतीश सोळंके यांनी माध्यमांशी बोलताना दिली. उपाचारासाठी परवानगी दिल्यानंतर जरांगेंना डिहायड्रेशन कव्हर करण्यासाठी सलाईन लावल्याचेही सोळंके यांनी सांगितले.

दरम्यान, केवळ सलाईनवरती मुंबईला प्रवास करता येणार नाही अशा स्थितीत रुग्णालयात ॲडमिट होण्याचा सल्ला आम्ही दिला आहे, असेही सोळंके यांनी सांगितले. मराठा आरक्षणाशी निगडीत विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. जरांगे पाटील यांचा ताफा पाटोद्यात दाखल झाला आहे. पण, जरांगे पाटील यांनी प्रकृती खालावली असल्याने वैद्यकीय पथकाने त्यांनी उपचार करण्याची परवानी मागितली. "उपचाराची परवानी मिळाल्यानंतर जरांगेंना डिहायड्रेशन कव्हर करण्यासाठी सलाईन लावण्यात आले आहे. लघवीच्या चाचणीतून पुढील निर्णय घेता येईल, पण अशा स्थितीत त्यांना रुग्णालयात ॲडमिट करण्याची गरज आहे", असे डॉ. सतीश सोळंके यांनी सांगितले.

## मनोज जरांगेंनी उपचार घेतले पाहिजेत, आंदोलन पुढेही करता येईल-देवेंद्र फडणवीस

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- मराठा समाजाला न्याय मिळावा म्हणून मनोज जरांगेंनी पुन्हा एकदा उपोषण सुरू केलं आहे. त्यांच्या उपोषणाचा आजचा १९ वा दिवस आहे. दरम्यान ते मुंबईकडे यायला निघाले असून १९ सप्टेंबरला आझाद मैदानावर उपोषण करणार अशी भूमिका त्यांनी घेतली आहे. मात्र त्यांच्या उपोषण आंदोलनाला मुंबई पोलिसांनी संमती दिलेली नाही. दरम्यान मनोज जरांगे यांची प्रकृती उपोषणामुळे खालावली आहे. याबाबत विचारलं असता मुख्यमंत्री



देवेंद्र फडणवीस यांनी सविस्तर प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगेंनी ॲडमिट व्हायला हवं आणि प्रकृतीची काळजी घ्यायला हवी असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

मला वाटतं की राज्य सरकारने नेहमीच चर्चा केली. चर्चेची तयारी आम्ही कायमच दाखवली आहे. तसंच मनोज जरांगेंच्या १३ पैकी १२ मागण्या आम्ही मान्य केल्या. एका मागणीमध्ये जी कायदेशीर अडचण आहे तीदेखील त्यांना समजावून सांगितली. आता त्यांनी सणासुदीच्या काळात आणि गणेश उत्सवाच्या पर्व सुरू आहे. मुंबई, पुण्यात किती उत्साहात उत्सव साजरा होतो हे सगळ्यांना माहीत आहे. अशा परिस्थितीत मनोज जरांगेंनी आंदोलनाचा निर्णय करू नये. (पान ४ वर)

## गणेशोत्सवात भाविकांना त्रास नको, जरांगेंनी आंदोलनाला स्थगिती द्यावी; मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांचे आवाहन

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षणासाठी आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघालेले आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर राज्य सरकारकडून समन्वयाची आणि सामंजस्याची भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात आली आहे. "सरकारने मराठा समाजाच्या बहुतांश सर्व मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही सुरू केली आहे. सध्या संपूर्ण महाराष्ट्रात हिंदू धर्माचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमध्ये लाखो भाविक रस्त्यावर असतात. त्यामुळे भाविकांना कोणताही त्रास होऊ नये आणि उत्सवात व्यत्यय येऊ नये, म्हणून जरांगे यांनी गणेशोत्सव संपेपर्यंत आपले आंदोलन स्थगित करावे," असे कळकळीचे आवाहन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले आहे. पत्रकार परिषदेत विखे पाटील यांनी आंदोलनातील कायदेशीर अडचणी, गॅझेटची वस्तुस्थिती आणि नेत्यांवर वापरल्या जाणाऱ्या (पान ४ वर)

## मनोज जरांगेंच्या मुंबईतील आंदोलनाविरोधात एमी फाऊंडेशनची हायकोर्टात याचिका

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील आझाद मैदानावर बेमुदत उपोषण करण्यासाठी अंतरवाली सराटीतून काल निघाले आहेत. मनोज जरांगे यांच्यावतीनं मुंबई पोलिसांकडे परवानगीसाठी परवानगी मागण्यात आली होती. मात्र, मुंबई पोलिसांकडून गेल्यावर्षीच्या आंदोलनाचा दाखला देत परवानगी नाकारण्यात आली होती. आता नव्या अपडेटनुसार मुंबई पोलिसांकडून आझाद मैदानात करण्यात येणाऱ्या आंदोलनाची सविस्तर माहिती मागवण्यात आली आहे. मुंबई आंदोलनासाठी येणाऱ्या व्यक्तींची नावं, स्वयंसेवकांची नाव पोलिसांकडून मागण्यात आली आहेत. या घडामोडी सुरु असतानाच मनोज जरांगे यांना मुंबईतील आझाद मैदानात आंदोलन करण्यास परवनागी देण्यात येऊ नये यासाठी एमी फाऊंडेशनतर्फे मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली आहे, अशी माहिती ॲड. महेंद्र रत्ना यांनी दिली.

मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या प्रस्तावित मराठा आरक्षण आंदोलनासाठी परवानगी न देण्याचे निर्देश देण्याची मागणी एमी फाऊंडेशननं याचिकेद्वारे मुंबई उच्च न्यायालयाकडे केली आहे. एमी फाऊंडेशन ही एक स्वयंसेवी संस्था आहे, जी सार्वजनिक कल्याण आणि सुरक्षेच्या संरक्षणासाठी समर्पित असल्याचा (पान ४ वर)

## मनोज जरांगेची भाषा योग्य नाही, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्याबाबत काहीही बोलतो; छगन भुजबळ यांची टीका

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- मनोज जरांगे यांनी पुन्हा एकदा बेमुदत उपोषण सुरू केलं असून ते मुंबईत यायला निघाले आहेत. आज त्यांची प्रकृती खालावली आहे. त्यामुळे ते मुंबईत येऊ शकणार की नाही हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे. आज त्यांच्या उपोषणाचा १९ वा दिवस आहे. दरम्यान मनोज जरांगेंबाबत छगन भुजबळ यांना प्रश्न विचारला असता त्यांची भाषा योग्य नाही असं म्हणत मनोज जरांगेंवर छगन भुजबळांनी टीका केली आहे.

मी सुरुवातीपासूनच मनोज जरांगेंच्या विरोधात भूमिका घेतली होती. त्याने अख्खं बीड



शहर पेटवलं होतं, हॉटेल्स कार्यकर्त्यांची पेटवली होती. मी जेव्हा ते सगळं पाहिलं तेव्हा हेदेखील पाहिलं की पोलीसही हतबल आहेत. त्यानंतर मी गप्प बसणार नाही असं ठरवलं होतं. आमदारांची घरं जाळली गेली तरीही तुम्ही गप्प बसत आहात तर मी गप्प बसणार नाही. त्यामुळे मी तिथेच जाहीर केलं होतं. की जाहीर सभा घेणार, त्यावेळी मी राजीनामाही पाठवला होता. मात्र मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री या दोघांही मला सांगितलं की जे काही बोलायचं बोला, पण राजीनामा देऊ नका. त्यावेळी ओबीसींची ताकद सगळ्यांना कळून चुकली असं छगन भुजबळ म्हणाले.

त्यानंतर पुढे छगन भुजबळ म्हणाले, मंत्रिमंडळाच्या बैठकीत मनोज जरांगेंच्या भाषेवरून रोष व्यक्त झाला. कारण तुम्ही (मनोज जरांगे) मुख्यमंत्र्यांबाबत त्यांच्या वडिलांच्या नावावरून बोलत आहात. चंद्रशेखर बावनकुळेंच्या आईबाबत घाणेरडी वक्तव्यं करता, एकनाथ शिंदे यांच्या विरोधातही वाट्टेल ते बोलतात. मला बोलून थकले आता या सगळ्यांना बोलत आहेत. मी मंत्रिमंडळात हा विषय काढला नव्हता. मी बाहेरच उत्तर देत होतो. ओबीसी संघटना, समता परिषद आम्ही लढा दिला होता. पण मंत्रिमंडळाच्या बैठकीत जरांगेंच्या भाषेबाबत रोष व्यक्त झाला. की मनोज जरांगेंचं हे काय चाललं आहे. हा माणूस किती घाणेरडं बोलतो आहे. जिल्हाधिकारी मॅडम गेल्या तेव्हाही तो घाणेरडंच बोलला. सगळ्या गोष्टी मान्य करतो म्हणून नॉनस्टॉपेबल गाडीच सुरू झाली त्याची. असं छगन भुजबळ यांनी म्हटलं आहे. कॉफी विथ कौशिक या विशेष मुलाखतीत मंत्री छगन भुजबळ यांनी हे मत व्यक्त केलं आहे.

## त्र्यंबकेश्वराचे दर्शन घेऊन परतताना एर्टीगा कारचा भीषण अपघात; एकाच कुटुंबातील ४ ठार, ६ जखमी

मुंबई दि.१६ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील मुंबई-नाशिक महामार्गावर शहापूर तालुक्यातील आटगाव येथे भीषण अपघाताची घटना घडली आहे. रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला इर्टीगा कारने जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात इर्टीगा कारमधील चार जणांचा मृत्यू झाला, तर सहा जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने शहापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. अपघातानंतर स्थानिकांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत, पोलिसांनाही पाचारण केले होते.

मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित इर्टिगा कारमधील प्रवासी त्र्यंबकेश्वर येथे दर्शन घेऊन मुंबईच्या दिशेने निघाले होते. आटगाव परिसरात आल्यानंतर रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वाहनाला इर्टिगा कारने जोरदार धडक दिली. कारने दिलेली धडक इतकी भीषण होती की, या अपघातात चार जणांचा जागीच मृत्यू झाल्याची माहिती मिळत आहे, तर सहा जण जखमी झाले आहेत. श्रीराम जैस्वाल, आयुष जैस्वाल, लाडो जैस्वाल आणि सुरज जैस्वाल अशी मृतांची नावे आहेत. तर, सुभी जैस्वाल, शिवम जैस्वाल, हाशिक जैस्वाल, सुनीता जैस्वाल, राधिका जैस्वाल आणि सतीश जैस्वाल हे जखमी असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. दरम्यान, अपघाताची माहिती मिळताच स्थानिक नागरिक आणि संबंधित यंत्रणांनी घटनास्थळी धाव घेतली. जखमींना तातडीने शहापूर उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. संबंधित इर्टिगा कार जोगेश्वरी येथील असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. या संपूर्ण घटनेचा तपास सध्या पोलीस घेत आहेत.

## भारत आणि पाकिस्तानच्या युद्धनौका अरबी समुद्रात एकमेकांना धडकल्या, दिल्लीत तातडीने मोठ्या हालचाली

नवी दिल्ली दि.१६ (वृत्तसंस्था)- अरबी समुद्रात भारतीय आणि पाकिस्तानी नौदलाच्या जहाजांची टक्कर झाली. ही घटना उत्तर अरबी समुद्रातील आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत घडली. भारताच्या म्हणण्यानुसार, नियमित देखरेख मोहिमेवर असलेले पाकिस्तानी जहाज अति वेगाने भारतीय युद्धनौकेच्या जवळ आले आणि त्याने धोकादायक पद्धतीने आपला मार्ग बदलला. या घटनेदरम्यान दोन्ही जहाजांची टक्कर झाली. या घटनेत कोणतेही मोठे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. सूत्रांनुसार, टक्कर झालेले पाकिस्तानी जहाज पीएनएस हुनैन आहे. हे पाकिस्तान नौदलाचे यारमौक-श्रेणीतील सागरी गस्ती जहाज असून, त्याचा वापर सागरी देखरेख आणि गस्तीसाठी केला जातो. टक्कर झालेल्या भारतीय नौदलाच्या जहाजाची ओळख अद्याप पटलेली नाही.

यानंतर, भारताने नवी दिल्लीतील पाकिस्तान उच्चायुक्तालयाच्या प्रभारी दूतांना बोलावून तीव्र निषेध नोंदवला. भारताने पाकिस्तानी नौदलाच्या जहाजाचे वर्तन अस्वीकार्य आणि अव्यावसायिक असल्याचे म्हटले आहे. एएनआयच्या वृत्तानुसार, भारतीय नौदलाचे एक युद्धपोत उत्तर अरबी समुद्रात नियमित देखरेख मोहिमेवर असताना, पाकिस्तानी नौदलाचे एक जहाज अति वेगाने भारतीय जहाजाच्या दिशेने आले. पाकिस्तानी जहाजाने मार्ग बदलणे हे असुरक्षित आणि अव्यावसायिक असल्याचे म्हटले जात आहे. त्यानंतर, दोन्ही जहाजांमधील अंतर हळूहळू कमी होत गेले आणि अखेरीस त्यांची टक्कर झाली. या धडकेत कोणतेही मोठे नुकसान झाल्याचे वृत्त नाही. तथापि, दोन्ही जहाजांची नावे आणि धडकेचे नेमके ठिकाण अद्याप जाहीर करण्यात आलेले नाही.

भारताने म्हटले आहे की, पाकिस्तानी जहाजाची ही कृती एप्रिल १९९१ मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यात झालेल्या कराराच्या कलम १० चे उल्लंघन आहे. दोन्ही देशांनी आधीच सहमती दर्शवली आहे की त्यांची युद्धपोते आणि पाणबुड्या आंतरराष्ट्रीय सागरी हद्दीत एकमेकांच्या खूप जवळ येणार नाहीत. जहाजांची टक्कर आणि इतर सागरी अपघात टाळण्यासाठी हे केले जाते. हा करार दोन्ही देशांच्या लष्करी कारवायांवर नियंत्रण ठेवणारे अनेक नियम स्थापित करतो. यामध्ये लष्करी कवायती आणि सैन्याच्या हालचालींची पूर्वसूचना देण्याच्या नियमांचा समावेश आहे. याशिवाय, समुद्रातील युद्धनौका आणि पाणबुड्यांमधील अंतराबाबतही नियम निश्चित करण्यात आले आहेत.

## ओबीसींचा स्वतंत्र पक्ष काढू; लक्ष्मण हाकेंचा इशारा

सांगली दि.१६ (प्रतिनिधी)- राज्यात मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांचे आंदोलन सुरू असताना ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांनी ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्य सरकार आणि मराठा आरक्षण आंदोलनावर टीका केली आहे. ओबीसींचे आरक्षण धोक्यात आले असून सरकारकडून या समाजाची दिशाभूल केली जात असल्याचा आरोप हाके यांनी केला. वेळ पडल्यास ओबीसींचा स्वतंत्र राजकीय पक्ष काढू, असा इशाराही त्यांनी दिला.

सांगलीत आयोजित पत्रकार परिषदेत लक्ष्मण हाके यांनी मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर आपली भूमिका मांडली. ओबीसी समाज असंघटित असल्यामुळे केवळ राजकीय फायद्यासाठी या समाजाचा वापर केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. मागासवर्गीय समाजातील नागरिकांच्या दाखल्यांबाबतही त्यांनी प्रश्न उपस्थित केले.

ओबीसी नेते या विषयावर ठोस भूमिका घेत नसल्याची टीका हाके यांनी केली. खासदार विशाल पाटील यांनी मराठा आंदोलनाला पाठिंबा दिल्याचा उल्लेख करत त्यांनी या भूमिकेवरही भाष्य केले. मराठा समाजातही कोणत्या प्रकारचे आरक्षण स्वीकारायचे, याबाबत संभ्रम असल्याचा दावा त्यांनी केला.

ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री दिशाभूल करत असल्याचा आरोप लक्ष्मण हाके यांनी केला. सरकारमधील मंत्री जरांगे पाटील यांची वारंवार भेट घेत असल्याने त्यांच्या आंदोलनाला बळ मिळत असल्याचे ते म्हणाले. ओबीसी आरक्षणाला सामान्य प्रवर्गासारखी वागणूक दिली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

जरांगे पाटील यांच्या आंदोलनाबाबत बोलताना लक्ष्मण हाके यांनी मराठा समाजातील गरीब घटकांच्या आरक्षणाच्या मागणीवर आपला आक्षेप नसल्याचे सांगितले. मात्र, ओबीसी समाजाच्या आरक्षणाला धक्का बसू नये, अशी भूमिका त्यांनी मांडली. मराठा समाजाच्या मागण्यांसाठी ओबीसी समाजाच्या हक्कांचे नुकसान होता कामा नये, असेही ते म्हणाले.

भाजप आमदार गोपीचंद पडळकर यांच्या भूमिकेवरही लक्ष्मण हाके यांनी प्रश्न उपस्थित केले. पडळकर हे सत्ताधारी पक्षाचे आमदार असल्याने त्यांनी सरकारविरोधात आंदोलन करण्याच्या भूमिकेवर हाके यांनी टीका केली. ते मुख्यमंत्र्यांच्या जवळचे आमदार असल्याचा आरोपही त्यांनी केला.

## आदिवासी वस्तीगृह व्यवस्थापनाचा करार फाडला; अभिजीत दिपके यांच्याकडून सरकाचा निषेध

नागपूर दि.१६ (प्रतिनिधी)- आदिवासी विकास विभागाने लक्ष्मण मानकर ट्रस्टसोबत केलेला ४९० आदिवासी वस्तीगृहांच्या व्यवस्थापनाचा करार रद्द करावा, अशी मागणी काक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी केली. कराराची प्रत फाडून त्यांनी राज्य सरकारचा निषेध केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय कन्व्हेन्शन सेंटर, नागपूर येथे विदर्भातील विविध जिल्ह्यांतून आलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांशी दिपके यांनी संवाद साधला. आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी लढताना मोजक्या आणि ठोस मागण्या निश्चित करून त्यासाठी सातत्याने संघर्ष करण्याचा सल्ला त्यांनी दिला. "एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी १२ मागण्यांसाठी आंदोलन केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यापैकी ११ मागण्या मान्य केल्यानंतर आंदोलन संपले. मात्र, विद्यार्थ्यांची प्रमुख मागणी पूर्ण झाली नाही," असा दाखला देत दिपके यांनी आंदोलनाच्या रणनीतीचे महत्त्व विद्यार्थ्यांना सांगितले.

आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना व्यापक जनसमर्थन मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी त्यांच्यासोबत घडणाऱ्या घटनांची माहिती समाजातील इतर घटकांपर्यंत पोहोचवावी, असे आवाहन दिपके यांनी केले. यासाठी घटनांचे व्हिडिओ तयार करून ते मोठ्या प्रमाणावर प्रसारित करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. काक्रोच जनता पार्टीच्या माध्यमातून मोठ्या संख्येने लोकांपर्यंत पोहोचता येते. आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या प्रश्नांची जाणीव समाजातील इतर घटकांना झाली, तर सरकारवरही प्रश्न सोडविण्यासाठी दबाव निर्माण होईल, असे दिपके म्हणाले.

## शिवसेना वैयक्तिक मालमत्ता असल्यासारखं उद्धव ठाकरे वागले, त्यांनी विचारधारा सोडल्यानेच पक्षात फूट; एकनाथ शिंदेंच्या वकिलांचा युक्तिवाद

नवी दिल्ली दि.१६ (वृत्तसंस्था)- शिवसेनेचे नेतृत्व उद्धव ठाकरे यांनी करावं की एकनाथ शिंदे यांनी करावं यावरून फूट पडली नाही. तर उद्धव ठाकरेंनी शिवसेनेची विचारधारा बाजूला सारून काँग्रेस सोबत जाण्याचा निर्णय घेतल्याने ती फूट पडली. उद्धव ठाकरे यांनी पक्षांतर्गत लोकशाही कधीच मानली नाही, तर ते पक्ष हा वैयक्तिक मालमत्ता असल्यासाखं वागले, असा युक्तिवाद शिंदेंचे वकील आणि जेष्ठ विधिज्ञ नीरज किशन कौल यांनी केला. त्यावेळच्या परिस्थितीचा विचार करता निवडणूक आयोगाने शिवसेना शिंदेंना देण्याचा निर्णय घेतला ते योग्यच होतं, असा युक्तिवादही कौल यांनी केला.

सर्वोच्च न्यायालयात शिवसेना ठाकरे गटाने २०२४ मध्ये दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी सुरू आहे. या याचिकेत महाराष्ट्र विधानसभा अध्यक्षांनी संविधानाच्या १०व्या अनुसूचीअंतर्गत शिंदेंच्या शिवसेना आमदारांना अपात्र ठरवण्यास नकार दिला होता. निवडणूक आयोगाने आणि विधानसभा अध्यक्षांनी त्यावेळी घेतलेल्या निर्णयाला आव्हान देण्यात आलं आहे. त्यावर आता सुनावणी सुरू आहे.

ज्येष्ठ विधिज्ञ नीरज किशन कौल: सादिक अली प्रकरणापासून हा निकष कशा प्रकारे विकसित झाला आणि निवडणूक आयोगाने प्रत्येक प्रकरणात तो कसा लागू केला, याचा विचार करावा. प्रत्येकजण असं म्हणतो की, आम्ही पक्षाच्या घटनेचं पालन करतो. मात्र, जेव्हा आपण पक्षाच्या संघटनात्मक रचनेचं परीक्षण करतो, तेव्हा काय दिसतं? हा पक्ष हुकूमशाही पद्धतीने चालवला जातो आणि त्यामध्ये तदर्थपणा दिसून येतो. पक्षाच्या दोन तृतीयांशपेक्षा जास्त सदस्यांची नियुक्ती पक्षाध्यक्षांकडून केली जाते.

ज्येष्ठ विधिज्ञ नीरज किशन कौल: अशा संघटनेत तळागाळातील कार्यकर्त्यांची इच्छा आणि भूमिका प्रतिबिंबित होते, हे सिद्ध करणारी कोणती सामग्री उपलब्ध आहे? निवडणूक आयोगाने अखेरीस असा निष्कर्ष काढला की, या प्रकरणातील विशिष्ट आणि असामान्य परिस्थिती लक्षात घेता, विधिमंडळातील बहुमत हा एकमेव व्यवहार्य निकष होता. सुभाष देसाई प्रकरणात विधिमंडळातील बहुमताच्या निकषाचा विचार करण्यास मनाई करण्यात आली आहे, असं सूचित करणं पूर्णपणे दिशाभूल करणारं आहे, हे मी दाखवून देईन.

सुभाष देसाई प्रकरणात वारंवार हे मान्य करण्यात आलं आहे की, निवडणूक आयोग आपल्या व्यापक आणि पूर्ण अधिकारांचा वापर करून, एखाद्या प्रकरणातील विशिष्ट तथ्ये आणि परिस्थिती लक्षात घेऊन योग्य असा निकष ठरवू शकतो.

# स्वातंत्र्यसेनानी यांना शब्दरूप आदरांजली..

**'समोर होता एकच तारा अन पायतळी अंगार !'**

अशा धेयधुंद भावनांनी ज्यांनी हैद्राबाद मुक्ती लढयासाठी जीवाची बाजी लावून तुरुंगवास भोगला हौतात्म्य पत्करले. अशा सर्व ज्ञात -अज्ञात स्वातंत्र्यसेनानी,वीरांगनाना ही शब्दरूप आदरांजली.....

**'स्वप्ने पडली उष:काळाची हाती मात्र अंध:कार**
**देश सारा उजळला जरी मराठवाड्याची काजळ रात'**

दिवस १५ ऑगस्ट १९४७ चा सर्ाया भारतभर स्वातंत्र्याचे पर्व सुरु झाले. परंतु हैद्राबाद संस्थान मात्र अजूनही भारतात विलीन झाले नवते. त्यामुळे हैद्राबाद संस्थानात असलेला मराठवाडा पारतंत्र्यात होता. स्वातंत्र्याचे सुख अनुभवर्णाया भारताच्या हृदयावर मराठवाड्याच्या पारतंत्र्याची बोचरी जखम होतीच. परकीय सत्तेविरुद्ध एकत्र येताना भारतीयांनी केलेला नेटाचा प्रयत्न हा कौतुकाचा खराच; पण स्वातंत्र्यानंतरही आणखी एका स्वातंत्र्यासाठी लढा देणं किती क्लेशदायक असेल? हैद्राबाद हे भारतातील एक मोठे संस्थान होते. स्वतंत्र भारतात सामील न होण्याचा निजामाचा अट्टाहास होता. तेलगु, मराठी, कानड भाषिक लोकांचा मोठा वर्ग या संस्थानात होता. जामाच्या जुलुमी अधिपत्याखाली या प्रांतातील लोकांना कोणतेही राजकीय व नागरी अधिकार नव्हते; म्हणून निजामाविरुद्ध जनमत तयार होऊ लागले. त्यातच निजामाचे पाठबळ असलेला कासीम रजवी याने आपल्या 'रझाकार' या संघटनेच्या माध्यमातून निष्पाप जनतेवर अमानुष अत्याचार सुरु केले.

**'रण पेटले पेटले रण अग्निज्वाला सर्वदूर**
**अंगार मनामनात झुगारु हा अंकुश'**


जनमताचा प्रक्षोभ उसळला. खेडी, शहर, निजामाविरुद्ध खदखदू लागली; आणि याला संघटनात्मक व वैचारिक आव्हान दिल, स्वामी रामानंद तीर्थ यांनी. १९३८ मध्ये स्थापन झालेल्या हैद्राबाद स्टेट कॉंग्रेसकडे याचे नेतृत्व आले. लढा घराघरात पोहोचला आणि प्रत्येक स्तरातून मुक्तिसंग्रामाचे सेनानी उभे राहिले. गोविंदभाई श्रॉफ, अनंत भालेराव, पुरूषोत्तम चपळगावकर, रामलिंग स्वामी, श्रीनिवासराव बोरीकर, किशोरभाऊ शहाणे यांनी हे स्फुलिंग चेतवले. या लढ्यात स्त्रियाही काही मागे नव्हत्या. आशाताई वाघमारे, करुनाबेन चौधरी, सुशीलाबेन दिवान यांची नावे आपल्याला घेता येतील. वेदप्रकाश श्यामलाल, गोविंद पानसरे, बहिर्जी शिंदे, श्रीधर वर्तक यासारख्या कित्येकांनी 'वंदे मातरम' चालवली अंतर्गत निजाम सरकारविरुद्ध आपला रोष व्यक्त केला.

# देश स्वातंत्र्यानंतर स्वातंत्र्य मिळालेला मराठवाडा आजही कमालीचा दुर्लक्षित

देशाला स्वातंत्र्य १५ ऑगस्ट, १९४७ रोजी मिळाले, देशाचा अविभाज्य भाग असलेल्या मराठवाड्याला तब्बल १वर्ष, १ महिना, २ दिवसानंतर स्वातंत्र्य मिळाले. मराठवाड्यात तत्कालीन निजाम सरकारची राजवट होती. देशात अनेक संस्थानिक होते.त्यापैकीच निजाम एक होते, त्या काळात निजाम सरकारने मराठवाड्या ची लूट करून मराठवाडा विकास पासून दूर ठेवला. मराठवाडा विभागातील जनतेचे प्रचंड छळवणूक व लुटालूट केल्या गेली.मात्र भारतीय भूमीचे ज्यांना पोलादी पुरुष म्हणून समजल्या जाते, ते भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कणखर नेतृत्वाने १७सप्टेंबर, १९४८ रोजी, मराठवाडा (तत्कालीन हैदराबाद विभाग)जुलमी निजामाच्या तावडीतून मुक्त झाला,व या मराठवाड्यातील नागरिकांनी स्वातंत्र्यचा श्वास घेतला. तत्कालीन पांच जिल्हे (आज आठ जिल्हे) मराठवाडा विभागात आहेत, निजाम काळात जी सापत्नपणाची वागणूक मराठवाडा विभागाला मिळत होती ती आजही आहे, आमचे महाराष्ट्र राज्य व इतर विभाग आजही मराठवाडा विभागाला सापत्न पणाची वागणूक देत आहेत. केंद्र सरकार व राज्य सरकार आजही मराठवाडा विभागाकडे लक्ष देत नाही, मराठवाड्याला त्यांचे हक्काचे पाणी मिळत नाही, मराठवाड्यात रेल्वे लाईन मिळत नाही. मराठवाड्यात औद्योगिक वसाहती ओस पडल्या आहेत, काही तर अजिबात विकसित नाहीत,मराठवाड्यातील उच्च विद्याविभूषित विद्यार्थ्यांना शासन दुय्यम समजून डावलत आहे, मराठवाडा विभागातील विद्यार्थ्यांना अन्य विभागात शिक्षण संस्थेत प्रवेश मिळत नाही. मराठवाडा ही संतांची भूमी आहे, ऐतिहासिक वारसा येथे मोठा आहे परंतु शासन त्यांचा विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करून देत नाही, कृषी क्षेत्रात कृषी क्षेत्रातील विकासाकडे दुर्लक्ष, मोठं मोठे उद्योग मराठवाड्यात नाहीत, त्यामुळे येथील सुशिक्षित विद्यार्थ्यांना राज्याच्या इतर भागात तुटपुंज्या वेतनावर काम करावे लागते. मराठवाडा विभागाला मंत्रिमंडळ मध्ये कमी दर्जाची खाती दिल्या जाते. मराठवाडा विभागातील साखर कारखाने बंद पडत आहेत. नवीन धरणांची निर्मिती नाही,मराठवाड्यातील कामगारच्या हाताला काम नाही. शैक्षणिक सोयी सुविधाकडे दुर्लक्ष, शेतकरी वर्गाकडे दुर्लक्ष, देशात सर्वात जास्त शेतकरी आत्महत्या मराठवाडा विभागात होत आहे. पण त्याची पाहिजे तशी दखल शासन घेत नाही. या मराठवाडा मुक्ती संग्राम दिन निमित्त केंद्र सरकार व राज्य सरकार मराठवाडा विभागाकडे विशेष लक्ष देईल व राज्याच्या इतर विभागास विकास करतील अशी अपेक्षा.

# 'निर्मोही राजयोगी'- -नाबाद ७६

**अर्थशास्त्रामध्ये** 'लॉ ऑफ डिमिनिशिंग मारजिनल यूटीलिटी' नावाचा एक प्रसिद्ध सिद्धांत आहे. एखाद्या वस्तूचा वारंवार उपभोग घेतला असता त्या वस्तूच्या उपभोगाने मिळणाऱ्या समाधानाचे/आनंदाचे प्रमाण प्रत्येक उपभोगाच्या वेळी घटत जाते असे या सिद्धांताचे सार आहे. एखाद्या निर्जीव वस्तूला/पदार्थाला अथवा अन्य कोणत्याही घटकाला लागू होणारा हा नियम राजकारणात/समाजकारणात सक्रिय असलेल्या कुठल्याही पुढऱ्याला/नेत्याला सुद्धा तेवढाच 'फिट' बसतो. यामुळेच राजकारणात 'अँटी इन्कबन्सी' ही डाव्या विचारवंतांची आवडती संकल्पना प्रचलित आहे. एखादे नेतृत्व जर सलग काही काळ राज्य करत असेल (देशात अथवा कुठल्याही राज्यात) तर सरणाऱ्या प्रत्येक दिवसागणिक प्रस्थापित नेतृत्वाची लोकप्रियता कणा कणाने कमी होत जाते हे गृहितक शीरसावंद्य मानणाऱ्या तथाकथित विचारवंतांना एका 'नेतृत्वाने' मात्र धक्का दिला आहे आणि हा धक्का असा तसा नाही तर या बुद्धीवाद्यांचा आत्मविश्वास ढासळून टाकणारा, त्यांना आपल्या ठोकळेबाज मांडणीचा फेरविचार करायला लावणारा असा आहे.



या नेतृत्वाचे नाव आहे 'नरेंद्र दामोदरदास मोदी', भारताचे सध्याचे प्रधानमंत्री. स्वर्गीय लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रमाणेच अत्यंत गरीब आणि सर्व साधारण घरात जन्मलेले नरेंद्रभाई, शास्त्री यांच्या पावलावर पाऊल टाकत देशाच्या पंतप्रधानपदी विराजमान झाले आहेत.

२०१४ला नरेंद्र मोदी भारताचे पंतप्रधान झाले. सलग १२ वर्षे ते देशाची धुरा सांभाळत आहेत. मोदी विरोधक त्यांना सत्तेवरून उलथून टाकण्यासाठी जंग जंग पछाडत आहेत. ते गुजरातचे मुख्यमंत्री असताना सुद्धा यू. पी. ए. सरकारने त्यांना त्रास देण्याची एकही संधी सोडली नव्हती. मोदींना 'खाऊ की गिळू' अशी त्या सरकारची अवस्था झाली होती. तरी सुद्धा संयमी मोदी 'हा माझा मार्ग एकला 'म्हणत आपले काम निष्ठेने करतच राहिले. यामुळेच ते लोकप्रियतेच्या शिखरावर पोहोचू शकले. निरनिराळ्या सर्वेक्षणातून त्यांची लोकप्रियता अधोरेखित होत आहे. साऱ्या जगात आज मोदीं इतका लोकप्रिय नेता दुसरा नाही. त्यांना अनेक देशांनी त्यांचे सर्वोच्च नागरी/राष्ट्रीय पुरस्कार प्रदान केले आहेत हे मोदींच्या लोकप्रियतेचेच प्रतिक आहे. नुकत्याच झालेल्या 'ब्रिक्स' च्या अंतरराष्ट्रीय परिषदेतही मोदींच्या यशस्वी कूटनीतीचा प्रत्यय सर्व जगाला आला.त्यामुळे देव पाण्यात घालून १२ वर्षे होऊन गेली तरी 'अँटी इन्कबन्सी रुपी 'अलक्ष्मी' आपल्याला पावत का नाही म्हणून विरोधक नैराश्यग्रस्त झाले आहेत.

मोदींची लोकप्रियता तरी किती असावी? 'नोटबंदी' सारखी कडू गोळी जनतेच्या घशात उतरवून सुद्धा मोदींच्या विश्वासार्हतेला काडीचा धक्का लागू शकला नाही.त्यापाठोपाठ जी. एस.टीची अंमलबजावणी करताना अनेक अडथळ्यांची शर्यत पार करावी लागली तरी व्यापारी वर्ग मोदींच्या मागे ठामपणे उभा राहिला.

२०२०-२१ च्या कोरोना महामारीच्या साथीने मोदींच्या नेतृत्वाची कसोटीच पाहिली. जगात अनेक प्रगत/अप्रगत देशात हाहाकार माजला होता.भारतात सुद्धा आणीबाणीची स्थिती उद्भवली होती. मोदींनी लॉक डाऊन पुकारून जनतेला जणू काही 'स्थानबद्ध' केले होते. अर्थचक्र थंडावले होते आणि जनतेत उद्याच्या भविष्याबद्दल पूर्ण काळोख होता. याही स्थितीतून भारत तावून सुलाखून बाहेर पडला. पात्र गरीब जनतेसाठी'गरीब कल्याण योजना राबवून जनतेच्या अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा भागवल्या. भारताने प्रतिबंधक लस निर्माण करून भारताबरोबरच अवघ्या जगाला फुकट लस पुरवून'वसुधैव कुटुंबकम' या आपल्या संस्कृतीचा परीचय अवघ्या जगाला करून दिला.

या सर्व परीक्षा पाहणाऱ्या काळात 'कठीण समय येता कोण कामास येतो? या प्रश्नाचे उत्तर होते 'नरेंद्र दामोदरदास मोदी'.त्यामुळेच तमाम भारतीय नागरिक'मतांच्या' रूपाने मोदींच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करत असतात.

राष्ट्रहित सर्वोतपरी या आपल्या ब्रीदवाक्याला जागून मोदींनी काश्मीरचे कलम ३७० रद्दबातल केले, हजारो वर्षांच्या संघर्षातून अयोध्येला राम मंदिराची उभारणी केली,जनतेचे दैनंदिन जीवन सुखावह होण्यासाठी अनेक पावले उचलली आणि भाजपच्या'वचननाम्यातील अनेक आश्वासनांची पूर्तता केली.'बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले' असे म्हणतात.भारतीय नागरिक म्हणूनच आज'मोदी मय ' झालेले दिसतात.

मोदी वृत्तीने 'सन्यस्त' असले तरी त्यांनी 'सन्यस्त खडग ' धारण केलेले नाही.'सर सलामत तो पगडी पचास' या न्यायानुसार भारताच्या सामरिक शक्तीला अनन्य साधारण महत्व देऊन आपल्या सीमा तर सुरक्षित केल्याच पण शत्रू राष्ट्राना'बळी तो कान पिळी' अशी अद्दलही घडवली. 'ऑपरेशन सिंदूर'ची विजयगाथा आज सर्व जग गात आहे हे त्याचेच द्योतक आहे.

आपल्या सैनिकांवर मातेप्रमाणे ममतेचा वर्षाव करणारे हे नेतृत्व'घास रोज अडतो ओठी सैनिकहो तुमच्यासाठी' असे म्हणत प्रत्येक दिवाळी सीमेवरील जवानांसोबत साजरी करते, मग आपल्या सैन्यदलांचे मनोबल हिमालयाएवढे उंचावले नाही तरच नवल!!

१७ सप्टेंबर २०२६ हा मोदीजींचा ७६ वा वाढदिवस. 'राष्ट्र सर्वप्रथम' या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विचारधारेचे चालते बोलते प्रतिक म्हणजे नरेंद्र मोदी. साध्या संघ स्वयंसेवकाच्या भूमिकेतून आपल्या राष्ट्र कार्याला सुरुवात करणारा हा द्रष्टा 'प्रचारक' आज हिंदुस्थानची भाग्यरेषा अवघ्या जगाच्या कॅनवासवर उंचावत आहे. बरं ही 'रेखा' दुसरी रेषा पुसून टाकून नव्हे तर त्या 'लकीरी ' पेक्षा आपली लकीर मोठी करून. त्यामुळेच कुठलाही देश/प्रदेश 'पादाक्रांत ' न करता भारतीय अर्थव्यवस्था १२ वर्षांपूर्वीच्या ११व्या स्थानावरून पहिल्या पाचात झेपावली आहे आणि येत्या दोन वर्षातच जगातील अग्रणी तीन अर्थसत्तात सामील होण्याची आस बाळगून आहे.मोदीजी एवढ्यावरच संतुष्ट नाहीत. त्यांनी भारताला २०४७ पर्यंत'विकसित भारत' बनवण्याचा ध्यास उराशी बाळगला आहे.'थिंक बिग' 'थिंक पॉझिटिव्ह' ही त्यांची मनोवृत्ती हा या आत्मविश्वासाचा स्रोत आहे.

मोदींची लोकप्रियता कायम आहे याचे मूळ त्यांच्याबद्दल भारतीयांच्या मनात वर्धिष्णू होत असलेल्या त्यांच्याबद्दलच्या'विश्वासाऱ्हतेत आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

मोदींबद्दल जनतेला जो विश्वास वाटतो त्याचे कारण मोदींचे नि:स्वार्थ आचरण हे आहे. जो माणूस सर्वसंग परित्याग करतो त्याला भारतीय संस्कृतीत दैवत्व प्राप्त होते कारण भारत 'भोगाला' नव्हे तर 'त्यागाला' पूजतो.एका सामान्य कुटुंबात जन्म घेतलेल्या मोदींनी राष्ट्रसेवेकरता सर्व ऐहिक पाश तोडून टाकले आहेत त्यामुळे 'भोगी' म णसांच्या गर्दीत 'योगी' मोदी ध्रुव ताऱ्यासारखे अढळ भासतात.या निर्मोही वृत्तीमुळेच आसेतू हिमाचल प्रत्येक भारतीयाच्या हृदयात/मनात घर करून राहिलेला नरेंद्र मोदींशिवाय अन्य कोणी 'तपस्वी' राजनेता दिसत नाही.

मोदी एवढे स्थितप्रज्ञ आहेत की 'वाटेवर काटे वेचीत चाललो, वाटले लता फुलात चाललो ' असाच त्यांचा अविर्भाव असतो. मोदी कधी 'सत्ता स्वयंवरात'उतरले नाहीत तरी सुद्धा सत्तासुंदरीने त्यांच्या गळ्यात 'राजमाला'घातली. ते नको म्हणत असताना गुजरातचे मुख्यमंत्रीपद त्यांच्या गळ्यात पडले. त्यानंतर एक तपाने ते थेट देशाच्या सिहासनावर आरूढ झाले आहेत ते आजतागायत. सलग २५ वर्षे ते 'राजयोग' भोगत आहेत ते जनतेचा'प्रधान सेवक' म्हणूनच.त्यांच्या ७६व्या वाढदिवसाचे व सलग २५ वर्षे राज्य /देशाचे नेतृत्व करण्याचे त्यांचे सातत्य राखण्याचे औचित्य साधून एन. डी ए. ने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या काळात 'सेवा संकल्प अभियान 'राबवण्याचा निर्णय घेतला आहे.

क्रिकेटमध्ये एखादा बॅट्समन ७५ धावांवर पोहोचतो तेव्हा त्याचे लक्ष शतकाकडे लागते त्याप्रमाणे नाबाद ७६ वर पोहोचलेला 'हा 'निर्मोही राजयोगी' आपले वयाचे 'शतकही' पूर्ण करेल अशी शुभकामना व्यक्त करतानाच तमाम भारतीय नागरिक त्यांना मनोमन आशीर्वाद देत असतील की'तू जे वांछील तो ते लाहो '

**-रघुनंदन भागवत**

# मराठवाड्याचा अपेक्षित समतोल विकास झालाच नाही

भारताच्या स्वातंत्र्यनंतर एक वर्ष, एक महिना, एक दिवसानंतर मराठवाडा विभाग निजामाच्या जुलुमी राजवटीतून मुक्त झाला व मराठी भाषिक राज्य म्हणून महाराष्ट्रात सामील झाला. त्या वेळी महाराष्ट्रचे तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी समतोल विकासाची भाषा केली होती.परंतु आजातागायत मराठवाडा विभागाचा अनुशेष भरलेला नाही.

**व्यथा मराठवाड्याची**

मराठवाडा मुक्ती संग्राम
दिनाच्या आजही कथा
मराठवाड्याच्या नशिबी
आजही व्यथाच,व्यथा
निजामाची होती
मराठवाड्यावर भिस्त
लुटून मराठवाडा
केला त्याने फस्त
अन्याय,अत्याचार असे
मराठवाड्याच्या पाचीला
आजही कुणी पुसेना
मराठवाड्याच्या मातीला
देश स्वतंत्र झाल्यावर ही
मराठवाड्यात होते पारतंत्र्य
मराठवाड्याला मिळाले
देशानंतर स्वातंत्र्य
आजही मोगलाई म्हणून
मराठवाड्याशी दुजाभाव
राज्याच्या ईतर भागाचा
मात्र सदा वाढता भाव
महाराष्ट्र शासनाने
अभ्यास सखोल करावा
मराठवाड्याचा सर्वांगीण
विकास घडवून आणावा

**- धोंडीरामसिंह राजपूत**

मागास मराठवाडा आजही मागासच आहे. पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, काही प्रमणात विदर्भ यांच्याकडे विशेष लक्ष देण्यात आल्याने त्यांचा विकास मोठ्या प्रमाणात झालेला आहे. मात्र मराठवाडा विभाग आजही सर्वच क्षेत्रात मागास राहिलेला आहे. मराठवाडा विभागाला हक्काचे पाणी मिळत नाही. सिंचनसाठी मराठवाडा विभागाला प्राधान्य नाही, औद्योगिक विकास बाबतीत ही मराठवाड्याकडे सातत्याने दुर्लक्ष आहे. मराठवाडा सतत दुष्काळाच्या गडद छायेत आहे, या बाबत मराठवाडा दुष्काळमुक्त व्हावा, विविध पाणी सिंचनाचे मार्ग मराठवाड्यात आखल्या जात नाही, उद्योग-व्यवसाय या बाबत ही शासनाचे मराठवाडा विभागाकडे दुर्लक्ष आहे. शैक्षणिक सुविधा, कृषी सुविधा, जल सुविधा, रेल्वे सुविधा, मार्ग सुविधा, रोजगार सुविधा या सर्वांबाबत आजपर्यंत मराठवाडा विभागाकडे दुर्लक्ष झालेले आहेत. मराठवाड्यातील पुढारी ही आपापसात श्रेय साठी लढत बसतात व नागरिकांच्या व विभागाच्या विकास कामाकडे दुर्लक्ष होते. मराठवाड्याचा मागास अनुशेष भरून काढण्यासाठी मराठवाडा विभागात मंत्रिमंडळ बैठक होऊन या विभागातील प्रश्नांवर चर्चा व निर्णय अपेक्षित असतांना गेल्या तीन-चार वर्षांपासून मंत्रिमंडळ बैठक घेणे बंद झाले आहे. मराठवाडा विभाग ज्या वेळी महाराष्ट्र राज्यात विलीन झाला त्या समयी मराठवाड्याचा मागास अनुशेष भरून काढू, असे आश्वासन देऊन ही तो अनुशेष अद्याप तसाच आहे. महाराष्ट्रात आजही मराठवाडा विभागाची उपेक्षाच होत आहे. महाराष्ट्र सरकारने या मागास मराठवाड्याचा अनुशेष त्वरित भरून काढण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करावे. या विभागातील शिक्षित वा अशिक्षित तरुण वर्गाच्या भवितव्यसाठी, शेती विकास औद्योगिक विकास साठी, जल संपदा वाढविण्यासाठी, शेतकरी वर्गाच्या सर्वांगिण विकासासाठी मराठवाडा विभागाकडे विशेष लक्ष देऊन मराठवाडा विभाग राज्याच्या ईतर विभागाच्या सम विकसित करावा अशी अपेक्षा आहे.

**- धोंडीरामसिंह राजपूत**

# मराठवाडा मुक्ती संग्राम : स्वातंत्र्य, लोकशक्ती आणि राष्ट्रीय एकात्मतेचा गौरवशाली अध्याय

**भारताला** १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले; मात्र तत्कालीन हैदराबाद संस्थानातील जनतेला भारतीय संघात सहभागी होण्यासाठी आणखी तेरा महिने प्रतीक्षा करावी लागली. या संस्थानात आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा, तेलंगणाचा प्रदेश आणि कर्नाटकातील काही भागांचा समावेश होता. त्यामुळे १७ सप्टेंबर १९४८ हा दिवस केवळ एका प्रदेशाच्या मुक्तीचा दिवस नसून, भारताच्या राष्ट्रीय एकात्मतेच्या प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाचा टप्पा म्हणून स्मरणात राहिला आहे.

**स्वातंत्र्य मिळाले; पण हैदराबाद संस्थान भारतात विलीन झाले नव्हते**

१५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिश सत्ता संपुष्टात आल्यानंतर संस्थानांच्या भारतात विलिनीकरणाचा प्रश्न निर्माण झाला. तत्कालीन हैदराबादचे निजाम मीर उस्मान अली खान यांनी हैदराबाद स्वतंत्र अस्तित्वात ठेवण्याची भूमिका घेतली. भारत सरकार आणि हैदराबाद संस्थान यांच्यात वाटाघाटी सुरू राहिल्या. काही काळासाठी स्थिती कायम ठेवण्याचा करार अर्थात 'जैसे थे' करार करण्यात आला. मात्र संस्थानातील राजकीय परिस्थिती अधिक गुंतागुंतीची होत गेली. गावागावांत रजाकारांविरुद्ध संघर्ष वाढत गेला. हैदराबाद संस्थानातील जनतेमध्ये नागरी हक्क, जबाबदार शासन आणि भारतीय संघात सहभागी होण्याची मागणी अधिक तीव्र होत होती. या लोकचळवळीला हैदराबाद स्टेट कॉंग्रेस, महाराष्ट्र परिषद तसेच विविध सामाजिक व राष्ट्रीय विचारांच्या संघटनांनी दिशा दिली.

**मराठवाड्यात जागृतीची बीजे**


मराठवाड्यातील मुक्ती संग्राम अचानक सुरू झालेला नव्हता. त्यामागे अनेक वर्षांची सामाजिक, शैक्षणिक आणि राजकीय जागृती होती. राष्ट्रीय विचारांचा प्रसार करण्यासाठी विविध ठिकाणी शाळा, वाचनालये आणि सामाजिक संस्था कार्यरत होत्या. परभणीचे नूतन विद्यालय, औरंगाबादचे सरस्वती भुवन विद्यालय, हिप्परगा येथील शारदा मंदिर, अंबाजोगाईचे योगेश्वरी विद्यालय, उदगीरचे श्यामलाल विद्यालय, लातूरमधील ज्युबिली विद्यालय, बीडचे चंपावती विद्यालय, नांदेडचे प्रतिभा निकेतन आदी संस्थांनी राष्ट्रीय जागृतीच्या कार्याला हातभार लावला. या कार्याला स्वामी रामानंद तीर्थ आणि बाबासाहेब परांजपे यांची प्रेरणा लाभली. १९३८ मध्ये हैदराबाद स्टेट कॉंग्रेसच्या स्थापनेने या चळवळीला संघटित राजकीय स्वरूप मिळाले. निजाम सरकारने या संघटनेवर बंदी घातल्यानंतर सत्याग्रहाचा मार्ग स्वीकारण्यात आला. मुक्तिसंग्रामासाठी स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, दिगंबरराव बिंदू, रवी नारायण रेड्डी, देवीसिंह चौहान, भाऊसाहेब वैशंपायन, शंकरसिंह नाईक, विजयेंद्र काबरा, बाळासाहेब परांजपे यांनी लढ्याचे नेतृत्व केले. काशिनाथ कुलकर्णी, दगडाबाई शेळके, विठ्ठलराव काटकर, हरिश्चंद्र जाधव, जनार्दन होर्टीकर गुरुजी, सूर्यभान पवार, आ. कृ. वाघमारे, विनायकराव चारठाणकर, विश्वनाथराव कातमेश्वरकर अशा अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास अजरामर केला आहे. गावागावातील संघर्षांमध्ये अनेक अनामिक वीरांनी आपले बलिदान दिले आहे. १९३८ च्या सत्याग्रहातील नांदेडच्या कार्यकर्त्यांचा सहभाग या लढ्यात विशेषत्वाने नोंदविला गेला आहे.

**आठ जिल्ह्यांची व्यापक लोकचळवळ**

आजच्या महाराष्ट्रातील मराठवाडा विभागात छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, नांदेड, परभणी आणि हिंगोली हे आठ जिल्हे आहेत. तत्कालीन काळातील प्रशासकीय सीमांमध्ये काही बदल झाले असले तरी या संपूर्ण मराठी भाषिक प्रदेशाने हैदराबाद मुक्तीच्या लढ्यात महत्त्वपूर्ण सहभाग नोंदविला. मराठवाड्याचा संपूर्ण मराठी भाषिक प्रदेश भारतीय संघात विलीन होण्यासाठी आतुर होता. बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई हे स्वामी रामानंद तीर्थ यांच्या कार्याचे प्रमुख केंद्र होते. हैदराबाद मुक्ती संग्रामात बीड जिल्ह्यातील अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी योगदान दिले आणि अनेक स्वातंत्र्यसैनिक हुतात्मा झाले. या व्यापक लढ्यात स्वामी रामानंद तीर्थ, गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा आणि पी. एच. पटवर्धन यांसारख्या नेत्यांची भूमिका महत्त्वाची ठरली. लढ्याचे स्वरूप केवळ एका शहरापुरते मर्यादित नव्हते. नांदेड, परभणी, सेलू, जालना, अंबड, बीड, उस्मानाबाद, लातूर, अंबाजोगाई, उदगीर, उमरी, धमर्बाद, कंधार, देगलूर आदी भागांत विविध स्वरूपाचे सत्याग्रह, जनजागृती आणि प्रतिकाराच्या चळवळी झाल्या.

**दडपशाहीला लोकशक्तीचा प्रतिकार**

स्वातंत्र्याच्या मागणीला तत्कालीन सत्तेकडून विरोध झाला. आंदोलनकर्त्यांना अटक, कारावास आणि विविध प्रकारच्या दडपशाहीला सामोरे जावे लागले. परिस्थिती अधिक गंभीर झाल्यानंतर रजाकारांच्या हिंसक कारवायांमुळे सामान्य नागरिकांच्या अडचणी वाढल्या. लोकशाही, नागरी हक्क आणि जबाबदार शासनासाठी जनतेने निकराचा संघर्ष केला. प्रशासनाच्या नोंदीनुसार, १९४२ च्या 'भारत छोडो' चळवळीत नांदेड, वैजापूर, गंगापूर, परभणी, सेलू, उस्मानाबाद, बीड, अहमदपूर, जालना आणि अंबड यांसारख्या ठिकाणी सत्याग्रहींना



कारावास भोगावा लागला. या आंदोलनामुळे हैदराबाद संस्थानातील स्वातंत्र्यवादी शक्ती अधिक संघटित झाल्या. स्वातंत्र्याच्या लढ्यातील या सहभागाने मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या लढ्याला आणखी गती मिळाली.

**निजामाची आणि भारताची भूमिका**

भारत सरकारने हैदराबाद प्रश्न सोडविण्यासाठी सुरुवातीला संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारला. मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याने भारताचे तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी निर्णायक भूमिका घेतली. १३ सप्टेंबर १९४८ रोजी 'ऑपरेशन पोलो' सुरू झाले. भारतीय सैन्याच्या कारवाईसमोर हैदराबाद संस्थानाच्या सैन्याचा प्रतिकार फार काळ टिकला नाही. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामाने शरणागती स्वीकारली आणि हैदराबाद राज्य भारतीय संघात सहभागी झाले. केंद्र सरकारच्या अधिकृत नोंदीत या प्रक्रियेला भारताच्या राजकीय एकात्मतेतील महत्त्वपूर्ण टप्पा म्हणून अधोरेखित केले आहे. स्वातंत्र्योत्तर भारताने संस्थानांचे एकत्रीकरण करताना संवाद, राजनैतिक प्रयत्न आणि आवश्यक त्या वेळी निर्णायक कारवाई यांचा समन्वय साधला. हैदराबादच्या प्रश्नावर भारत सरकारने सुरुवातीला संवाद व राजनैतिक प्रयत्नांचा मार्ग स्वीकारला; मात्र परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्यानंतर निर्णायक लष्करी कारवाई करण्यात आली. हैदराबादचा संघर्ष आणि विलीनीकरण हा एकसंघ भारतासाठी अत्यंत महत्त्वाचा निर्णय ठरला. भारताच्या मध्यभागी स्वतंत्र राज्याचे अस्तित्व कायम राहिल्यास निर्माण होणारी राजकीय व प्रशासकीय गुंतागुंत किती गंभीर ठरली असती, याची कल्पना आजही करता येते. भारताच्या राजकीय एकात्मतेच्या दृष्टीने ही कारवाई किती महत्त्वाची होती, हे त्यानंतरच्या घडामोडींवरून स्पष्ट होते. त्यामुळे संस्थानांच्या विलीनीकरणासाठी झालेला हा संघर्ष भारताच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण घटनाक्रम ठरला आहे.

**भाषिक वेगळेपणही लक्षणीय ठरले** – १९४८ मध्ये भारतीय संघात समाविष्ट झालेले हैदराबाद संस्थान आज एकाच राज्याचा भाग नाही. त्यातील मराठवाडा महाराष्ट्रात, तेलुगू भाषिक प्रदेश तेलंगणात आणि कन्नड भाषिक प्रदेश कर्नाटकात समाविष्ट झाला. तत्कालीन हैदराबाद राज्यात आजच्या तेलंगणासह मराठवाडा आणि कर्नाटकातील काही जिल्ह्यांचा समावेश होता. भाषावार प्रांतरचनेनंतर मराठवाडा १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याचा भाग झाला. अशा प्रकारे १९४८ मध्ये भारतीय संघाशी जोडलेला हा प्रदेश पुढे आधुनिक महाराष्ट्राच्या प्रशासकीय आणि सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक बनला.

**१७ सप्टेंबर : मुक्ती संग्राम दिन** – महाराष्ट्र शासनाने ४ मे २००१ रोजी शासन निर्णयाद्वारे १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा विभागात 'मुक्ती संग्राम दिवस' म्हणून कायमस्वरूपी साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर १७ सप्टेंबर रोजी मराठवाड्यात शासकीय पातळीवर विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांत हा दिवस साजरा केला जातो. विभागीय मुख्यालय असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्याची परंपरा आहे. इतर जिल्ह्यांतही पालकमंत्री किंवा नियुक्त मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण केले जाते. छत्रपती संभाजीनगर येथे मुख्यमंत्री ध्वजारोहण करतात, कारण हे शहर मराठवाड्याचे विभागीय मुख्यालय असून मुक्ती संग्रामाच्या स्मृतींशी जोडलेले प्रमुख केंद्र आहे. स्मृतिस्तंभाला अभिवादन, हुतात्म्यांना श्रद्धांजली, ध्वजारोहण, मानवंदना आणि विविध शासकीय कार्यक्रमांद्वारे या इतिहासाचे स्मरण केले जाते. महाराष्ट्र शासन मुक्ती संग्रामाचा इतिहास पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी १०० कोटी रुपये खर्चून छत्रपती संभाजीनगर येथे स्मारक उभारत आहे.

**इतिहासाचा सन्मान, भविष्याची प्रेरणा**

मराठवाडा मुक्ती संग्राम हा केवळ भूतकाळातील संघर्ष नाही. तो लोकशाही, स्वातंत्र्य, नागरी हक्क, राष्ट्रीय एकात्मता आणि लोकसहभागाच्या मूल्यांची जाणीव करून देणारा इतिहास आहे. या लढ्यात ज्ञात-अज्ञात असंख्य स्वातंत्र्यसैनिक, कार्यकर्ते, महिला, युवक आणि सामान्य नागरिकांनी योगदान दिले. त्यांच्या त्यागामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाड्याच्या भारतीय संघात विलिनीकरणाचा मार्ग मोकळा झाला. १७ सप्टेंबर रोजी तिरंगा अभिमानाने फडकताना त्या काळातील स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाची आठवण होते. हा दिवस अन्यायाविरुद्धच्या लोकशाही मूल्यांच्या आणि भारताच्या एकात्मतेच्या विजयाचे स्मरण करून देतो. मराठवाड्याने भारताच्या एकात्मतेसाठी दिलेले योगदान इतिहासाच्या पानांवर अढळ आहे. छत्रपती संभाजीनगरपासून नांदेडपर्यंत, जालन्यापासून लातूरपर्यंत, बीडपासून धाराशिवपर्यंत आणि परभणीपासून हिंगोलीपर्यंत या भूमीने स्वातंत्र्याची आस जपली आणि राष्ट्रीय प्रवाहात सहभागी होण्यासाठी संघर्ष केला. त्या ज्ञात-अज्ञात वीरांना आणि वीरांगनांना कृतज्ञ अभिवादन करणे आणि त्यांच्या त्यागातून लोकशाही व राष्ट्रीय एकात्मतेची मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे, हीच मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाची खरी प्रेरणा आहे. १७ सप्टेंबर हा त्यामुळे केवळ स्मरणाचा दिवस नाही; तो मराठवाड्याच्या देशभक्तीला, लोकशक्तीला आणि अखंड भारताच्या एकात्मतेला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

**– प्रवीण टाके,** उपसंचालक
विभागीय माहिती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

# मराठवाडा मुक्तिसंग्राम : स्वातंत्र्याची दुसरी पहाट

**भारताला** १५ ऑगस्ट १९४७ रोजी ब्रिटिशांच्या दीर्घकाळ चाललेल्या राजवटीतून स्वातंत्र्य मिळाले. देशभर स्वातंत्र्याचा उत्सव साजरा झाला आणि भारतीय जनतेने परकीय सत्तेच्या जोखडातून मुक्त झाल्याचा आनंद व्यक्त केला. मात्र या स्वातंत्र्याची पहाट भारताच्या प्रत्येक प्रदेशात एकाच वेळी उगवली नाही. तत्कालीन हैदराबाद संस्थानातील मराठवाडा, तेलंगण आणि कर्नाटकातील काही प्रदेश अजूनही निजामाच्या अधिपत्याखाली होते. त्यामुळे ब्रिटिश सत्तेपासून भारत स्वतंत्र झाला असला, तरी या प्रदेशातील जनतेला निजामशाहीच्या राजवटीतून मुक्त होण्यासाठी आणखी एका संघर्षाला सामोरे जावे लागले. या संघर्षाचे अंतिम पर्व १७ सप्टेंबर १९४८ रोजी संपन्न झाले. हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले आणि मराठवाड्याच्या जनतेला निजामाच्या राजवटीतून मुक्ती मिळाली. म्हणूनच १७ सप्टेंबर हा दिवस मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन म्हणून स्मरणात ठेवला जातो. हा दिवस केवळ एका ऐतिहासिक घटनेचे स्मरण करण्याचा दिवस नसून स्वातंत्र्य, लोकशाही, मानवी प्रतिष्ठा आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी लढलेल्या असंख्य ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाला अभिवादन करण्याचा दिवस आहे.

हैदराबाद संस्थान हे तत्कालीन भारतातील सर्वांत मोठ्या संस्थानांपैकी एक होते. निजामाच्या अधिपत्याखालील या संस्थानात आजच्या तेलंगणाचा मोठा भाग, महाराष्ट्रातील संपूर्ण मराठवाडा आणि कर्नाटकातील काही प्रदेशांचा समावेश होता. निजामाची सत्ता स्वतंत्र भारताच्या राजकीय प्रक्रियेपासून वेगळी राहण्याचा प्रयत्न करीत होती. भारत स्वतंत्र झाल्यानंतर संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण हा राष्ट्रीय एकात्मतेचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न बनला. अनेक संस्थानांनी भारतात विलीन होण्याचा निर्णय घेतला; मात्र हैदराबाद संस्थानाच्या बाबतीत परिस्थिती गुंतागुंतीची होती. निजामाला स्वतंत्र अस्तित्व टिकवून ठेवण्याची इच्छा होती. परिणामी भारतीय संघराज्यात सामील होण्याची मागणी करणाऱ्या जनतेचा संघर्ष अधिक तीव्र झाला.

मराठवाड्यातील जनतेच्या संघर्षाची मुळे केवळ १९४७ नंतरच्या राजकीय परिस्थितीत शोधता येत नाहीत. निजामशाहीच्या काळात राजकीय स्वातंत्र्य, अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य, संघटन स्वातंत्र्य आणि शिक्षणाच्या संधी यांवर अनेक मर्यादा होत्या. सामान्य जनतेमध्ये असंतोष निर्माण होत होता. सामाजिक आणि आर्थिक विषमता, प्रशासनातील केंद्रीकरण आणि जनतेच्या राजकीय सहभागाचा अभाव यामुळे स्वातंत्र्याची आकांक्षा अधिक तीव्र होत गेली. भारतीय स्वातंत्र्यलढ्याने देशभरात निर्माण केलेली राष्ट्रीय जाणीव मराठवाड्यातही पोहोचली होती. भारतीय राष्ट्रध्वज, 'वंदे मातरम्'चा जयघोष आणि लोकशाही शासनव्यवस्थेची मागणी यांतून जनतेच्या मनातील परिवर्तनाची इच्छा स्पष्टपणे व्यक्त होत होती.

हैदराबाद स्टेट काँग्रेसने या संघर्षाला संघटित स्वरूप देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. स्वामी रामानंद तीर्थ हे या आंदोलनातील प्रमुख नेते म्हणून पुढे आले. त्यांनी हैदराबाद संस्थानातील जनतेला लोकशाही अधिकारांसाठी संघटित करण्याचे काम केले. मराठवाड्यातील अनेक कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. गोविंदभाई श्रॉफ, विजयेंद्र काबरा, पी. एच. पाटवर्धन यांसारख्या कार्यकर्त्यांनी संघर्षाला दिशा दिली. त्यांच्या सोबत असंख्य कार्यकर्ते गावोगावी जनजागृती करीत होते. अनेकांनी तुरुंगवास भोगला, पोलिसांचा छळ सहन केला, आर्थिक संकटांना सामोरे गेले आणि आपल्या कुटुंबीयांपासून दूर राहून स्वातंत्र्याच्या लढ्यात योगदान दिले. या संघर्षाचा इतिहास केवळ काही नेत्यांचा इतिहास नसून सामान्य माणसाच्या धैर्याचा आणि त्यागाचा इतिहास आहे.

मराठवाडा मुक्तिसंग्रामात ग्रामीण समाजाचा सहभाग विशेष महत्त्वाचा होता. गावातील शेतकरी, कामगार, विद्यार्थी, शिक्षक, व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते आणि महिला यांनी आपल्या परीने आंदोलनाला पाठिंबा दिला. त्या काळात माहितीची साधने मर्यादित होती; तरीही स्वातंत्र्य आणि लोकशाहीची जाणीव लोकांपर्यंत पोहोचत होती. गावागावांतून कार्यकर्ते तयार झाले. अनेकांनी सरकारी दडपशाहीची पर्वा न करता राष्ट्रीय विचारांचा प्रचार केला. काहींनी भूमिगत राहून कार्य केले. काहींनी सत्याग्रह केले, तर काहींनी कारावास पत्करला. या सर्व प्रयत्नांतून निजामशाहीविरोधातील लोकमत अधिक व्यापक होत गेले.

या काळातील परिस्थिती अधिक गंभीर बनविण्यात रझाकारांच्या हिंसक कारवायांचा मोठा वाटा होता. निजामाच्या सत्तेला पाठिंबा देणाऱ्या रझाकारांनी स्वातंत्र्य आणि भारतीय संघराज्यातील विलिनीकरणाची मागणी करणाऱ्या जनतेवर दडपशाही केली. अनेक भागांत भीतीचे वातावरण निर्माण झाले. सामान्य नागरिकांवर अत्याचार झाले. आंदोलनकर्त्यांना धमकावले गेले. त्यामुळे जनतेच्या मनातील असंतोष आणखी वाढला. या हिंसक वातावरणातही स्वातंत्र्याची मागणी मागे घेण्यास अनेक कार्यकर्ते तयार नव्हते. स्वातंत्र्य हा त्यांच्यासाठी केवळ राजकीय अधिकार नव्हता, तर तो मानवी प्रतिष्ठेचा प्रश्न बनला होता.

भारत सरकारसमोर हैदराबाद संस्थानाचा प्रश्न दिवसेंदिवस अधिक गंभीर होत गेला. भारताची भौगोलिक आणि राजकीय एकात्मता टिकविण्यासाठी संस्थानांचे विलीनीकरण आवश्यक होते. तत्कालीन उपपंतप्रधान आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी संस्थानांच्या भारतातील विलीनीकरणात निर्णायक भूमिका बजावली. हैदराबाद संस्थानाच्या प्रश्नावर चर्चा आणि वाटाघाटींचे प्रयत्न झाले; मात्र परिस्थितीत अपेक्षित तोडगा निघाला नाही. अखेर भारत सरकारने सप्टेंबर १९४८ मध्ये लष्करी कारवाई करण्याचा निर्णय घेतला. १३ सप्टेंबर १९४८ रोजी सुरू झालेल्या या कारवाईला 'ऑपरेशन पोलो' असे नाव देण्यात आले. काही दिवसांच्या कारवाईनंतर निजामाने शरणागती पत्करली आणि १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले.

१७ सप्टेंबर हा त्यामुळे मराठवाड्याच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा दिवस ठरला. मात्र या दिवसाचा अर्थ केवळ लष्करी कारवाईच्या यशापुरता मर्यादित ठेवणे योग्य ठरणार नाही. त्यामागे अनेक वर्षे चाललेला जनसंघर्ष, कार्यकर्त्यांचे त्याग, जनजागृती, सत्याग्रह, कारावास आणि सामान्य जनतेच्या स्वातंत्र्याच्या आकांक्षा होत्या. भारतीय सैन्याच्या कारवाईने मुक्तीची निर्णायक प्रक्रिया पूर्ण केली; परंतु त्यासाठी पोषक वातावरण तयार करणाऱ्या जनआंदोलनाचे योगदान तितकेच महत्त्वाचे होते. म्हणून मराठवाडा मुक्तिसंग्रामाची गाथा सांगताना राजकीय नेतृत्वासोबतच सामान्य जनतेच्या सहभागाचे स्मरण करणे अत्यावश्यक आहे.

मुक्तिसंग्रामाचे महत्त्व केवळ निजामशाहीच्या अंतामध्ये नाही, तर त्यातून निर्माण झालेल्या लोकशाहीच्या नव्या पर्वात आहे. राजकीय सत्ता ही जनतेच्या संमतीवर आधारित असावी, नागरिकांना समान अधिकार मिळावेत, कायद्यापुढे सर्व समान असावेत आणि शासन जनतेप्रती उत्तरदायी असावे, ही लोकशाहीची मूलभूत तत्त्वे आहेत. निजामशाहीच्या राजवटीविरुद्ध संघर्ष करणाऱ्या जनतेच्या आकांक्षांना पुढे भारतीय संविधानाने व्यापक आणि संस्थात्मक अधिष्ठान दिले. म्हणूनच मराठवाडा मुक्तिसंग्रामाचा इतिहास संविधानाच्या मूल्यांशी जोडून समजून घेणे आवश्यक आहे.

भारतीय संविधानाने स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांना सर्वोच्च स्थान दिले. आज आपण या मूल्यांचा उपभोग घेत असलो, तरी त्यांचे संरक्षण करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. मुक्तिसंग्रामात ज्यांनी संघर्ष केला, त्यांनी पुढील पिढ्यांसाठी अधिक चांगल्या समाजाचे स्वप्न पाहिले होते. त्यामुळे त्यांच्या त्यागाचे स्मरण केवळ पुष्पहार अर्पण करून किंवा शासकीय कार्यक्रम आयोजित करून पूर्ण होत नाही. त्यांच्या स्वप्नातील समाज निर्माण करण्यासाठी सामाजिक विषमता कमी करणे, शिक्षण सर्वांपर्यंत पोहोचविणे, महिलांना समान संधी देणे, वंचित घटकांच्या अधिकारांचे संरक्षण करणे आणि लोकशाही संस्थांना अधिक सक्षम करणे आवश्यक आहे.

मराठवाड्याच्या सामाजिक आणि आर्थिक विकासाचा प्रश्नही या संदर्भात महत्त्वाचा आहे. मुक्तीनंतरच्या काळात या प्रदेशाने शिक्षण, शेती, उद्योग, आरोग्य, वाहतूक आणि सामाजिक क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली. अनेक शैक्षणिक संस्था उभ्या राहिल्या. उच्च शिक्षणाच्या संधी वाढल्या. उद्योग आणि सेवा क्षेत्राचा विस्तार झाला. तरीही मराठवाड्यापुढे पाणीटंचाई, शेतीची अनिश्चितता, बेरोजगारी, स्थलांतर, ग्रामीण दारिद्र्य, आरोग्यविषयक अडचणी, औद्योगिक मागासलेपणा आणि प्रादेशिक असमतोल यांसारखी आव्हाने कायम आहेत. त्यामुळे राजकीय मुक्तीनंतर सामाजिक आणि आर्थिक विकासाची नवी लढाई सुरू ठेवणे आवश्यक आहे.

आजच्या पिढीने मराठवाडा मुक्तिसंग्रामाकडे केवळ गौरवाच्या दृष्टिकोनातून पाहू नये, तर त्यातून प्रेरणा घ्यावी. त्या काळातील लोकांनी आपल्या अधिकारांसाठी आवाज उठविला. आज आपल्या हातात संविधानाने दिलेले मतदानाचे, अभिव्यक्तीचे, शिक्षणाचे आणि समानतेचे अधिकार आहेत. या अधिकारांचा जबाबदारीने वापर करणे हे मुक्तिसंग्रामातील वारशाचे जतन करण्यासारखेच आहे. लोकशाहीमध्ये नागरिकांची भूमिका केवळ मतदान करण्यापुरती मर्यादित नसते. सार्वजनिक प्रश्नांवर जागरूक राहणे, प्रशासनाकडून पारदर्शकता आणि उत्तरदायित्वाची अपेक्षा करणे, सामाजिक अन्यायाविरुद्ध आवाज उठविणे आणि संविधानिक मार्गाने परिवर्तनासाठी प्रयत्न करणे हीदेखील नागरिकांची कर्तव्ये आहेत.

मुक्तिसंग्रामाच्या इतिहासाचे जतन करण्याची जबाबदारीही तितकीच महत्त्वाची आहे. अनेक स्वातंत्र्यसैनिकांच्या आठवणी, पत्रे, छायाचित्रे, दस्तऐवज आणि मौखिक इतिहास अजूनही स्थानिक पातळीवर विखुरलेला आहे. त्याचे शास्त्रीय पद्धतीने संकलन आणि संवर्धन झाले पाहिजे. प्रत्येक जिल्ह्यातील आणि गावातील मुक्तिसंग्रामाशी संबंधित इतिहास शोधून काढणे आवश्यक आहे. शाळा-महाविद्यालयांमध्ये स्थानिक इतिहासाच्या अभ्यासाला प्रोत्साहन मिळाले पाहिजे. ज्यांनी प्रत्यक्ष संघर्ष केला त्यांच्या कुटुंबीयांच्या आठवणी नोंदवून ठेवणे आवश्यक आहे. इतिहास हा केवळ पाठ्यपुस्तकातील काही तारखा आणि घटनांचा संग्रह नसतो; तो समाजाच्या सामूहिक स्मृतीचा महत्त्वपूर्ण भाग असतो.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाची आठवण करताना समाजात कोणत्याही प्रकारचा द्वेष निर्माण होऊ नये, हीदेखील काळाची गरज आहे. इतिहासाचे स्मरण हे वर्तमानातील सामाजिक सलोखा मजबूत करण्यासाठी झाले पाहिजे. हा संघर्ष अन्याय, दडपशाही आणि लोकशाहीच्या अभावाविरुद्ध होता. त्यामुळे त्यातून मिळणारा संदेश हा मानवता, स्वातंत्र्य, समता आणि बंधुतेचा असला पाहिजे. कोणत्याही धर्म, जात किंवा भाषिक समूहाविषयी द्वेष निर्माण करण्याऐवजी लोकशाही मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीला प्राधान्य दिले पाहिजे. इतिहासाचा उपयोग विभाजनासाठी नव्हे, तर समाजाला एकत्र आणण्यासाठी झाला तरच त्याचे स्मरण सार्थ ठरेल.

आज मराठवाड्याच्या विकासाचा विचार करताना येथील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचविणे ही खरी गरज आहे. ग्रामीण शेतकरी, महिला, कामगार, विद्यार्थी, आदिवासी, भटके-विमुक्त, दिव्यांग व्यक्ती, वृद्ध आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणणे म्हणजे आधुनिक अर्थाने सामाजिक मुक्तीची वाटचाल होय. स्वातंत्र्याचा अर्थ केवळ राजकीय सत्ता बदलणे नसून प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने, सुरक्षितपणे आणि समान संधींसह जगता येणे हा आहे. त्यामुळे मुक्तिसंग्रामाच्या स्मृतीला विकासाच्या आणि सामाजिक न्यायाच्या ध्येयाशी जोडणे आवश्यक आहे.

१७ सप्टेंबरचा दिवस आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो की आपल्याला मिळालेल्या स्वातंत्र्याचा आपण किती जबाबदारीने उपयोग करीत आहोत? ज्यांनी निजामशाहीविरुद्ध संघर्ष केला, त्यांनी लोकशाही आणि स्वाभिमानासाठी त्याग केला. आज आपल्यासमोरची आव्हाने वेगळी आहेत. सामाजिक विषमता, आर्थिक असमानता, बेरोजगारी, पर्यावरणीय संकट, शिक्षणातील विषमता, डिजिटल दरी आणि सार्वजनिक जीवनातील उदासीनता या नव्या समस्या आहेत. या समस्यांविरुद्ध संविधानिक मार्गाने आणि लोकशाही पद्धतीने संघर्ष करणे हीच आजच्या पिढीची जबाबदारी आहे.

मराठवाडा मुक्तिसंग्रामाची खरी शिकवण अशी आहे की, अन्याय कितीही दीर्घकाळ टिकला तरी जनतेची स्वातंत्र्याची आकांक्षा दडपता येत नाही. संघटित जनशक्ती, धैर्य, त्याग आणि लोकशाही मूल्यांवरील विश्वास यांच्या बळावर परिवर्तन घडवून आणता येते. १७ सप्टेंबर १९४८ रोजी निजामशाहीचा अंत होऊन मराठवाड्याच्या इतिहासात स्वातंत्र्याची नवी पहाट उगवली. त्या पहाटेचा प्रकाश पुढील पिढ्यांच्या जीवनात अधिक व्यापक करण्याचे काम आज आपल्याला करायचे आहे.

म्हणूनच मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन हा केवळ उत्सवाचा किंवा औपचारिक अभिवादनाचा दिवस न राहता आत्मपरीक्षणाचा दिवस झाला पाहिजे. ज्ञात-अज्ञात स्वातंत्र्यसैनिकांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांच्या संघर्षातून मिळालेली स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि लोकशाहीची मूल्ये आपल्या सार्वजनिक आणि वैयक्तिक जीवनात रुजविण्याचा संकल्प केला पाहिजे. मराठवाड्याचा इतिहास आपल्याला संघर्षाची प्रेरणा देतो, तर भारतीय संविधान आपल्याला परिवर्तनाचा मार्ग दाखवते.

या दोन्हींच्या संगमातून अधिक न्याय्य, समताधिष्ठित, संवेदनशील आणि विकसित मराठवाड्याची निर्मिती करणे हीच १७ सप्टेंबरच्या मुक्तिसंग्राम दिनाची खरी आदरांजली ठरेल. स्वातंत्र्यसैनिकांनी ज्या स्वाभिमानासाठी संघर्ष केला, तो स्वाभिमान प्रत्येक नागरिकाच्या जीवनात दिसला, लोकशाही प्रत्येकाच्या दारापर्यंत पोहोचली आणि विकासाचा लाभ समाजातील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचला, तरच मराठवाडा मुक्तिसंग्रामाची गाथा खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**

## जिल्ह्यात स्वच्छता पंधरवडा प्रभावीपणे राबवा; मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम. यांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर, दि. १६ (प्रतिनिधी) – ग्रामीण भागातील नागरिकांना नियमित आणि शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे, यासाठी जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मिन्नू पी.एम. यांनी केले आहे.

या स्वच्छता पंधरवड्यात गावांमध्ये पाणीपुरवठ्यासाठी उभारण्यात आलेल्या पाण्याच्या साठवणूक टाक्या, विहिरी आणि पिण्याच्या पाण्याचे स्रोत यांची स्वच्छता करण्यात येणार आहे. तसेच शाळा व अंगणवाडी केंद्रांमधील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या आणि पाणीपुरवठ्याशी संबंधित परिसराचीही साफसफाई केली जाणार आहे. अभियानादरम्यान पिण्याच्या पाण्याच्या विविध स्रोतांमधून पाण्याचे नमुने संकलित करून प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात येणार आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतींनी पाणी भरण्याची ठिकाणे, टाक्या, पाणी स्रोत आणि त्यांचा परिसर स्वच्छ ठेवण्यावर विशेष भर द्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. गावातील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या, शाळा व अंगणवाडीतील पाण्याच्या टाक्या तसेच पाणीपुरवठ्याचे स्रोत यांची नियमित स्वच्छता करून पाण्याची गुणवत्ता तपासण्यासाठी नमुने प्रयोगशाळेत पाठविण्याचे आवाहन जिल्हा परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. हे अभियान यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक वासुदेव सोळंके, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र./पं.) राघवेंद्र घोरपडे, जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक साहेबराव चव्हाण, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेळके तसेच जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाच्या वतीने ग्रामपंचायतींना सहभागाचे आवाहन करण्यात आले आहे.

## 'व्हॉइस ऑफ मीडिया'ची छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**अध्यक्षपदी कानिप अन्नपूर्णे, कार्याध्यक्षपदी किशोर महाजन, उपाध्यक्षपदी बाळासाहेब रांजणीकर**





छत्रपती संभाजीनगर, दि. १६ (प्रतिनिधी) – पत्रकारांच्या न्याय्य हक्कांसाठी आणि त्यांच्या सामाजिक, आर्थिक व व्यावसायिक प्रश्नांसाठी देशपातळीवर कार्यरत असलेल्या 'व्हॉइस ऑफ मीडिया'च्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. व्हॉइस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. संदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रदेशाध्यक्ष श्री. विजय चोरडिया यांनी या कार्यकारिणीची निवड केली. जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी कानिप अन्नपूर्णे यांच्याकडे, तर कार्याध्यक्षपदाची धुरा किशोर महाजन यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

पत्रकारांच्या विविध प्रश्नांना संघटितपणे वाचा फोडणे, त्यांच्या न्याय्य हक्कांसाठी शासन व प्रशासनाकडे प्रभावी पाठपुरावा करणे आणि जिल्ह्यात संघटनेची ताकद अधिक भक्कम करण्याच्या उद्देशाने नव्या कार्यकारिणीची रचना करण्यात आली आहे.

जिल्हा कार्यकारिणीत उपाध्यक्षपदी बाळासाहेब रांजणीकर, अरुण सुरडकर आणि मधुकर महाले, सचिवपदी विजय अवसरमोल, सहसचिवपदी शेख अनिस, कोषाध्यक्षपदी सईद शेख, सहकोषाध्यक्षपदी सतीश जाधव, तर जिल्हा संघटकपदी पुरुषोत्तम तळेकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

कार्यकारिणी सदस्य म्हणून सुरेश शिरसागर, राजू खंडाळकर, गणेश खरात, कल्याण अन्नपूर्णे, डॉ. शेख अफसर, मयूर सावजी, मच्छिंद्र नागरे, रमेश जाबा आणि मोहसीन शेख यांचा समावेश करण्यात आला आहे.

ग्रामीण तसेच शहरी भागातील पत्रकारांना संघटनेच्या प्रवाहात आणणे, पत्रकारांच्या अडचणींना तातडीने प्रतिसाद देणे, त्यांच्या कल्याणासाठी विविध उपक्रम राबविणे आणि पत्रकारांच्या प्रश्नांवर शासनदरबारी ठोस भूमिका मांडणे, या दिशेने नवी कार्यकारिणी काम करणार आहे.

राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष विजय चोरडिया यांच्या नेतृत्वात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 'व्हॉइस ऑफ मीडिया'चे संघटन अधिक व्यापक आणि मजबूत करण्याचा निर्धार नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. नव्या कार्यकारिणीतील सर्व पदाधिकारी व सदस्यांचे पत्रकार तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांकडून अभिनंदन होत आहे.

## उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांनी केली गणरायाची आरती




वैजापूर, दि. १६ (प्रतिनिधी) – येथील श्री. स्वामी समर्थ केंद्रातील श्री स्वामी समर्थ सांस्कृतिक गणेश मंडळाच्या श्री. गणेश मूर्तीची आरती मंगळवार(ता.१५) रोजी वैजापूर उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांच्याद्वारे सम्पन्न झाली. त्यांनी या मंडळाच्या सांस्कृतिक, सामाजिक, नैतिक मूल्ये तसेच नैसर्गिक मूल्ये जपणाऱ्या उपक्रमाचे अभिनंदन केले. या प्रसंगी नगरसेवक लिमेश वाणी, सचिन वाणी, देविदास वाणी, जेष्ठ पत्रकार घनश्याम वाणी, बापू गावडे, सी.के. पवार, सामाजिक कार्यकर्ते व जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत, उल्हास साळुंके, सचिन राजपूत, मधुकर साळुंके, समर्थ सुमनबाई आलूले, सुरेश आलूले, गुळसर, कार्तिक वाणी व श्री. स्वामी समर्थ सेवेकरी उपस्थित होते.

## श्री गणेशा आरोग्य अभियान २०२६ अंतर्गत वैजापूरात आरोग्य तपासणी शिबीर




वैजापूर, दि. १६ (प्रतिनिधी) – मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष यांच्या वतीने श्री. गणेशोत्सवानिमित्त १४सप्टेंबर ते २५सप्टेंबर २०२६ या दरम्यान राज्यभर शासनाच्या परिपत्रक नुसार 'श्री. गणेशा आरोग्य तपासणी अभियान-२०२६ आयोजित करण्यात आलेले आहे. याचा भाग म्हणून नगराध्यक्ष डॉ. दिनेश परदेशी, उपनगराध्यक्ष रियाज अकिल शेख व मुख्याधिकारी भागवत बिघोत राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवार (ता.१५) रोजी मोरया गणेश मंडळाच्या ठिकाणी 'श्री. गणेशा आरोग्य तपासणी अभियान-२०२६' जिल्हा आरोग्य समिती सदस्य तथा जेष्ठ नागरिक धोंडीरामसिंह राजपूत यांच्या उपस्थितीत हे शिबिर घेण्यात आले.

हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना, पालिका भगवान महावीर रुग्णालय व तालुका आरोग्य वर्धिनी केंद्र यांच्या वतीने वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभम मित्रा, डॉ.प्रकाश राठोड, वैद्यकीय अधिकारी डॉ. खोकड (राजपूत), मुख्य नर्स निर्मला बोरगे, योगेश चव्हाण, अक्षय सूर्यवंशी, वैद्यकीय लॅबच्या सना शेख, सतीश त्रिभुवन, संगीता सिरसाट, अशोक गाडेकर यांनी रुग्णांचे रक्त तपासणी व आरोग्य तपासणी करून गोळ्या व औषधी ही रुग्णांना दिली. शहरातील गणेश मंडळांनी दररोज होणाऱ्या या शिबिराला सहकार्य करावे व जास्तीत जास्त रुग्णांनी तपासणी करून घेऊन आपल्या आरोग्यची काळजी घ्यावी, असे आवाहन धोंडीराम राजपूत यांनी केले.

## स्व. यशवंत पाध्ये यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्रातील संपादकांचा होणार गौरव

मुंबई, दि. १६ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र संपादक परिषदेचे संस्थापक आणि ज्येष्ठ पत्रकार स्व. यशवंत पाध्ये यांच्या स्मृतिदिनानिमित्त महाराष्ट्रातील संपादक आणि ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र संपादक परिषदेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत घेण्यात आला. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, शाल-श्रीफळ तसेच रोख रक्कम देऊन संपादकांचा गौरव करण्यात येणार आहे.



महाराष्ट्र संपादक परिषदेच्या कार्यकारिणीची बैठक एकनाथ बिरवटकर यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईतील शिवाजी पार्क येथील होरायझन टॉवरमधील परिषदेचे उपाध्यक्ष सुधीर भाऊ जाधव यांच्या कार्यालयात संपन्न झाली. बैठकीत परिषदेच्या आगामी उपक्रमांसह विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

स्व. यशवंत पाध्ये यांनी महाराष्ट्रातील वृत्तपत्र संपादकांना एकत्रित व्यासपीठ मिळावे, त्यांच्या प्रश्नांना संघटितपणे वाचा फुटावी आणि संपादकांना समाजात योग्य मानसन्मान मिळावा, या उद्देशाने महाराष्ट्र संपादक परिषदेची स्थापना केली.

पत्रकारितेच्या क्षेत्रात त्यांनी प्रदीर्घ काळ योगदान देताना संपादकांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या प्रतिष्ठेसाठी सातत्याने भूमिका मांडली. विशेषतः स्थानिक व प्रादेशिक वृत्तपत्रांच्या संपादकांना भेडसावणाऱ्या अडचणी शासन आणि संबंधित यंत्रणांच्या निदर्शनास आणून देण्यासाठी त्यांनी संघटनात्मक पातळीवर प्रयत्न केले. संपादक हा केवळ वृत्तपत्राचा व्यवस्थापक नसून समाजातील प्रश्नांना वाचा फोडणारा, लोकमत घडविणारा आणि लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची जबाबदारी पार पाडणारा घटक आहे, ही भूमिका स्व. यशवंत पाध्ये यांनी सातत्याने अधोरेखित केली. महाराष्ट्रातील संपादकांना सन्मानाची वागणूक मिळावी, त्यांच्या कार्याची दखल घेतली जावी आणि पत्रकारितेतील योगदानाचा गौरव व्हावा, यासाठी त्यांनी केलेले कार्य महत्त्वपूर्ण मानले जाते. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढे नेण्याच्या उद्देशाने त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त संपादक व ज्येष्ठ पत्रकारांचा सन्मान करण्याचा निर्णय घेण्यात आला. या उपक्रमामुळे महाराष्ट्रातील पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या संपादकांच्या योगदानाची दखल घेतली जाणार असून, नव्या पिढीतील पत्रकार आणि संपादकांनाही प्रेरणा मिळेल, असा विश्वास बैठकीत व्यक्त करण्यात आला. बैठकीच्या प्रारंभी महाराष्ट्र संपादक परिषदेचे सचिव स्व. अनंत ऊर्फ राजू पाध्ये यांना उपस्थितांनी आदरांजली अर्पण केली. बैठकीस परिषदेचे कार्याध्यक्ष प्रकाश कुलथे, उपाध्यक्ष सुधीर भाऊ जाधव, संस्थेचे उपाध्यक्ष गजानन चव्हाण, दीपाताई पाध्ये, हेमंत सामंत, राजेंद्र मोहिते,अरुण सुरडकर, गोरख तावरे, डी. पी. विष्णुपुरीकर यांच्यासह कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in

या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# एससी-एसटीच्या ४६०० कोटींचा निधी पळवणाऱ्या मंत्री संजय शिरसाट, अशोक उईके यांच्या घरांवर एससी-एसटी समूहांचा धडक मोर्चा!



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- अनुसूचित जाती आणि जमातीच्या (एससी-एसटी) विकासासाठी राखीव असलेला ४६०१.१३ कोटींचा निधी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेसाठी वळवण्यात आल्याचा तीव्र निषेध नोंदवत अनुसूचित जाती, जमातीच्या समूहांनी वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाठ यांच्या औरंगाबाद येथील घरावर तर आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांच्या यवतमाळ येथील घरावर धडक मोर्चा नेला.

औरंगाबाद येथील आंदोलनात वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे, राज्य कार्यकारिणी सदस्य आणि शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी बोलताना प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे यांनी राज्य सरकारवर थेट हल्लाबोल केला. एससी-एसटीच्या निधीचा काय घोटाळा केला, हे महाराष्ट्राच्या जनतेसमोर आलेच पाहिजे, अशी रोखठोक भूमिका पातोडे यांनी मांडली. सामाजिक न्याय विभागाचा निधी इतरत्र वळवून मागासवर्गीय समाजाच्या हक्कांवर गदा आणल्याचा आरोप करत आंदोलकांनी मंत्री संजय शिरसाट यांच्या घराबाहेर जोरदार घोषणाबाजी केली.

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेत मोठा घोटाळा झाला असून यात एससी, एसटी समूहांचा निधी पळवण्यात आला तसेच राज्य सरकारने या योजनेसाठी मोठी तरतुद करून १५०० कोटी रुपये अतिरिक्त ठेवले होते, असे असतांना ही आदिवासी विभागातून १ हजार कोटी रुपये तर समाज कल्याण विभागातून ३५०० कोटी रुपये पळवले आहेत. राज्य सरकारच्या ह्या योजनेवर केंद्र सरकारच्या कॅगने यात मोठा भ्रष्टाचार झाल्याचे म्हटले आहे. औरंगाबाद येथील मोर्च्यात पोलिसांनी विनाकारण आंदोलनकर्त्यांची अडवणूक करण्याचा प्रयत्न कार्यकर्त्यांनी हाणून पाडला.

दुसरीकडे यवतमाळ येथेही वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वात एससी-एसटी समाजाने आदिवासी विकासमंत्री अशोक उईके यांच्या घरावर मोर्चा नेला. एससी-एसटीच्या हक्काच्या ४६०१.१३ कोटी निधीची लूट करणाऱ्या कमिशनखोर धोरणाचा धिक्कार करत आंदोलकांनी मंत्री अशोक उईके यांच्या यवतमाळ येथील घरासमोर निदर्शने सुरू केली आहेत. राज्य शासनाने हा निर्णय तातडीने मागे न घेतल्यास हे आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा वंचित बहुजन आघाडीकडून देण्यात आला आहे.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे प्रदेशाध्यक्ष राजेंद्र पातोडे, प्रा. नागोराव पांचाळ, जितरत्न पटाईत, दीपक डोके, ज्ञानेश्वर कवठेकर, उत्तम वनशिवे, नगरसेवक अमित भुईगळ, नगरसेविका करुणा जाधव, जिल्हाध्यक्ष रुपचंद गाडेकर, रामेश्वर तायडे, पंकज बनसोडे, सतीश गायकवाड यांच्यासह मोठ्या संख्येने नागरीक, कार्यकर्ते उपस्थित होते.

# एन-७ सिडको मनपा शाळेत मोफत सिटी बससेवेचा शुभारंभ



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- आयुक्त अमोल येडगे यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त रणजीत पाटील व उप आयुक्त तथा विभाग प्रमुख अंकुश पांढरे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिका केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, एन-७ सिडको येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सोयीसाठी सुरू करण्यात आलेल्या मोफत सिटी बस सेवेचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरनगर, मिसरवाडी आणि वैशाली ढाबा येथील विद्यार्थी बस स्टॉपवरून या बससेवेचा शुभारंभ श्रीफळ वाढवून करण्यात आला.

यावेळी प्रभागाच्या नगरसेविका सुरेखा सानप, प्रशासन अधिकारी संजीव सोनार, सहाय्यक कार्यक्रमाधिकारी ज्ञानदेव सांगळे, शिक्षण विस्तार अधिकारी रईसा बेगम आणि विजय कोल्हे उपस्थित होते.

उद्घाटनप्रसंगी विद्यार्थ्यांचे गुलाबपुष्प व पेढे देऊन स्वागत करण्यात आले. तसेच बसचालक व वाहक यांचाही सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक मनोज अग्रवाल यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन वैशाली देशमुख यांनी केले, तर आभार अंजली कुलकर्णी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक व सेवकांनी परिश्रम घेतले.

# मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास लेखनातून जपणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस; आयुक्त अमोल येडगे यांचा विद्यार्थ्यांशी संवाद

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- मराठवाडा मुक्ती संग्रामाचा इतिहास विद्यार्थ्यांना अवगत व्हावा, या उद्देशाने महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून मनपा माध्यमिक शाळांतील विद्यार्थ्यांच्या मराठवाडा मुक्ती संग्राम संग्रहालय भेटीचे आयोजन करण्यात येत आहे. आतापर्यंत सहा शाळांतील विद्यार्थ्यांनी संग्रहालयाला भेट दिली असून, आज मनपा माध्यमिक शाळा मिटमिटा व बेगमपुरा येथील विद्यार्थ्यांनी संग्रहालयाची पाहणी केली.

भेटीनंतर आयुक्त अमोल येडगे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मराठवाडा मुक्ती संग्रामाच्या कालखंडाविषयी, तसेच या लढ्यात सहभागी झालेल्या थोर नेत्यांविषयी प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून माहिती घेतली.

संग्रहालय भेटीतून मिळालेली माहिती विद्यार्थ्यांनी त्याच दिवशी सायंकाळी लेखी स्वरूपात तयार करून शिक्षकांकडे जमा करावी. उत्कृष्ट माहिती लेखन करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात येईल, असे आयुक्त अमोल येडगे यांनी सांगितले.

या वेळी उपायुक्त अंकुश पांढरे, उपायुक्त विकास नवाळे, उद्यानप्रमुख विजय पाटील, कार्यक्रम अधिकारी ज्ञानदेव सांगळे, सांस्कृतिक अधिकारी सर्वेश नांद्रेकर, क्रीडा अधिकारी संजीव बालया, क्रीडा समन्वयक सागर मगरे तसेच संबंधित शाळांचे शिक्षक उपस्थित होते.

# सेवा संकल्प अभियानाची मराठवाडा विभागात सक्षमतेने अंमलबजावणी करा-विभागीय आयुक्त जी. श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- सेवा संकल्प अभियानाची मराठवाडा विभागात सक्षमतेने, नियोजनबद्ध व काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी विभागातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांना दिले.


राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी आज घेतलेल्या बैठकीनंतर विभागीय आयुक्तांनी सर्व जिल्हाधिकारी व संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधून अभियानातील प्रत्येक उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या.

उद्यापासून शासकीय निर्देशानुसार नियोजित प्रत्येक दिवसाच्या उपक्रमाची काटेकोर अंमलबजावणी होईल आणि त्याचा थेट लाभ नागरिकांपर्यंत पोहोचेल, याकडे सर्व अधिकाऱ्यांनी विशेष लक्ष द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

सेवा सेतू शिबिरे, विविध शासकीय सेवा व योजनांचा लाभ, स्वच्छता व श्रमदान, जनजागृती तसेच 'सेवा माझे योगदान'सह अभियानांतर्गत नियोजित सर्व उपक्रमांमध्ये विभागातील आठही जिल्ह्यांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

# राज्याच्या विकासात महावितरण अभियंत्यांचे मोलाचे योगदान

## सहव्यवस्थापकीय संचालक गजेंद्र बावणे यांचे गौरवोद्गार; 'अभियंता दिन' उत्साहात साजरा



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- देशाच्या विकासात अभियांत्रिकी क्षेत्राचे महत्वाचे योगदान आहे. त्याचप्रमाणे राज्याच्या विकासात महावितरणमधील अभियंत्यांचे मोलाचे योगदान आहे, असे गौरवोद्गार महावितरणच्या छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक विभागाचे सहव्यवस्थापकीय संचालक गजेंद्र बावणे यांनी काढले.

महावितरणच्या शहर व ग्रामीण मंडलातर्फे मंगळवारी भानुदास चव्हाण सभागृहात भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त अभियंता दिन साजरा करण्यात आला. या सोहळ्याचे प्रमुख अतिथी म्हणून श्री.बावणे बोलत होते. ते म्हणाले की, महावितरणचे अभियंते ग्राहकांना अखंडित वीजपुरवठा करण्याचे जिकिरीचे, महत्त्वाचे काम करतात. मात्र त्यांची मेहनत ग्राहकांपर्यंत पोचत नाही. त्यासाठी महावितरण व ग्राहकांमधील दरी अभियंत्यांनी दूर करावी. ग्राहकांना आपुलकी वाटेल असे काम करावे. त्यामुळे ग्राहकांचा विश्वास वाढेल. ग्राहकांना दर्जेदार सेवा देऊन महावितरणचा नावलौकिक वाढवण्यासाठी काम करा, असे आवाहन श्री.बावणे यांनी केले. प्रमुख अतिथी उद्योजक प्रसाद कोकीळ यांनी महावितरण अभियंत्यांच्या कामगिरीचे कौतुक करताना सर्वांना विद्युत सुरक्षेची काळजी घेण्याचे आवाहन केले. लाईफ कोच मिताली लाठी यांनी तणाव व्यवस्थापनावर मार्गदर्शन केले. छत्रपती संभाजीनगर परिमंडलाचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर यांनी अध्यक्षीय समारोप केला. ते म्हणाले की, महावितरण अभियंत्यांनी व्यक्त व्हायला हवे. आपले काम जनतेपर्यंत पोचवले पाहिजे. नवनवीन कौशल्ये आत्मसात करून बदलाला सामोरे जायला हवे. महावितरणच्या उन्नतीसाठी अहोरात्र कष्ट करा आणि ग्राहकांना सर्वोत्कृष्ट सेवा द्या, असे आवाहन कुमठेकर यांनी केले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून अधीक्षक अभियंता मनीष ठाकरे, गोरक्षनाथ सपकाळे, बीना सावंत यांची उपस्थिती होती. उपकार्यकारी अभियंता स्मिता वाघमारे, सहायक अभियंता अविनाश चव्हाण यांनी मनोगत व्यक्त केले. उपव्यवस्थापक पांडुरंग पठाडे यांनी सूत्रसंचालन केले. अश्विनी पोतलवाड यांनी परिचय करून दिला. प्राजक्ता पगारे यांनी आभार मानले.

कार्यक्रमास प्रभारी महाव्यवस्थापक प्रवीण गायकवाड, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मधुसूदन मराठे, कार्यकारी अभियंता प्रवीण जोशी, गिरीश गायकवाड, प्रेरणा बनकर, अविनाश चांदेकर, प्रणिता भालेराव, प्रसाद महातोले, महेंद्र देशमुख, विनय घनबहादूर, रमेश वाघचौरे यांच्यासह शहर व ग्रामीण मंडलातील अभियंते, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पीएम सूर्य घर व 'स्मार्ट' योजनेची माहिती आता तालुका पातळीवर; महावितरण उभारणार 'किओस्क'

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- केंद्र सरकारच्या नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालयाच्या वतीने राज्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा सेतू कॅम्प'चे विशेष आयोजन करण्यात आले आहे. या मोहिमेअंतर्गत 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' आणि 'स्वयंपूर्ण महाराष्ट्र आवासीय रूफटॉप सोलर (स्मार्ट)' योजनेची माहिती ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी महावितरण तालुका पातळीवर विशेष 'किओस्क' उभारणार आहे.

महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी सर्व तालुका पातळीवर हे किओस्क उभारण्याचे निर्देश दिले आहेत. या किओस्कच्या माध्यमातून ग्राहकांना रूफटॉप सौर ऊर्जा योजनांचा लाभ घेण्याबाबत प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाईल. किओस्कमध्ये सौर योजनेसाठी ऑनलाईन अर्ज कसा करावा, याचे थेट प्रात्यक्षिक व मार्गदर्शन महावितरणच्या कर्मचाऱ्यांकडून केले जाईल.विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे ग्राहकांना घटनास्थळीच ऑनलाईन अर्ज भरण्यासोबतच सोलर सिस्टीमसाठी लागणाऱ्या बँक कर्जासाठीही अर्ज करता येईल. 'पीएम सूर्य घर मोफत वीज योजना' आणि 'स्मार्ट' योजनेची सविस्तर माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

नागरिकांनी महावितरणच्या या उपक्रमाचा आणि सुविधांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन महावितरण प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.


दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY NAME
**OLD NAME :** SHUMILA FIRDOS NAIM SAYYED
**NEW NAME :** SHUMAILA FIRDOUS MOHAMMED IBRAHIM
ADD: H NO.1-19-22,NEAR POST OFFICE,JUNA BAZAR,AURANGABAD.M.S.431001.*

दैनिक लोकविजय **CHANGE OF NAME**

I HAVE CHANGING MY NAME FROM
**OLD NAME -** KHAN IRAM NAAZ MOAZZAM
TO
**NEW NAME -** KHAN IRAM NAAZ GULAM DASTAGIR KHAN
AS PER DOCUMENT
**ADDRESS -** H.NO.4-11-38, NEAR BILQIS MASJID, ROSHAN GATE, MAQSOOD COLONY, AURANGABAD, 431001 MAHARASHTRA

महावितरण — महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**निविदा सूचना**

कार्यकारी अभियंता शहर विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर यांचेकडून संगणक, लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर, UPS प्रणाली, संबंधित उपकरणे व नेटवर्किंगची वार्षिक देखभाल व दुरुस्ती या कामासाठी लघु फेर निविदा क्र. क्रमांकाद्वारे दि.१७.०९.२०२६ ते २४.०९.२०२६ पर्यत मागविण्यात येत आहे. कामासबंधीचा सविस्तर तपशील https://etender.mahadiscom.in/eatApp/latestTendersWorks# या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**पीआरओ क्र. AZ १३३/२०२६** **कार्यकारी अभियंता,**
**शहर विभाग क्र.१, छत्रपती संभाजीनगर**


# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या मुख्य कार्यक्रमाची रंगीत तालीम संपन्न

## सिद्धार्थ उद्यान येथे सनदी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तयारीचा प्रत्यक्ष आढावा



छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त १७ सप्टेंबर रोजी सिद्धार्थ उद्यान येथे आयोजित करण्यात येणाऱ्या मुख्य प्रशासकीय ध्वजारोहण कार्यक्रमाची रंगीत तालीम आज (दि. १६) सकाळी नऊ वाजता सनदी अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.

विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी विनय गवडा, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, महानगरपालिका आयुक्त अमोल येडगे तसेच जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी. एम. यांच्या उपस्थितीत सिद्धार्थ उद्यान येथे ही रंगीत तालीम पार पडली.

यावेळी मान्यवरांचे आगमन, ध्वजारोहण, मानवंदना, स्वातंत्र्यसैनिकांसाठी करण्यात आलेली आसन व्यवस्था, माध्यम प्रतिनिधींसाठीची व्यवस्था तसेच सुरक्षा व्यवस्था आणि कार्यक्रमाशी संबंधित इतर अनुषंगिक बाबींची प्रत्यक्ष रंगीत तालीम घेण्यात आली. कार्यक्रमादरम्यान कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी संबंधित विभागांनी केलेल्या तयारीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यात आला.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त सिद्धार्थ उद्यान येथे मुख्य प्रशासकीय ध्वजारोहण कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, राज्याचे मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात येणार आहे.

मुख्य कार्यक्रमाच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व तयारी पूर्ण करण्यात आली असून, कार्यक्रमाचे नियोजन, सुरक्षा व्यवस्था आणि विविध विभागांमध्ये समन्वयाची पाहणी करण्यासाठी आज रंगीत तालीम घेण्यात आली.

(पान १ वरुन)

## मनोज जरांगेंनी उपचार घेतले पाहिजेत,...

अनेक दिवस त्यांचं आंदोलन सुरू आहे. त्यामुळे त्यांच्या प्रकृतीवरही विपरित परिणाम होतो आहे. त्यांनी ॲडमिट झालं पाहिजे, उपचार घेतले पाहिजेत. आंदोलन पुढेही करता येईल. पण प्रकृती सांभाळली पाहिजे हे महत्त्वाचं आहे. सरकार खुल्या मनाने सगळ्या गोष्टी मान्य करतं आहे. त्यामुळे मुंबईला येऊन या ठिकाणी गणेश उत्सवात ताण तयार होईल असं आपण करू नये असं आमचं मत आहे.

## गणेशोत्सवात भाविकांना त्रास नको,...

भाषेवर सविस्तर भाष्य केले.

मनोज जरांगे यांच्याकडून सातारा आणि कोल्हापूर गॅझेट लागू करण्याबाबत होत असलेल्या मागणीवर बोलताना विखे पाटील यांनी कायदेशीर वस्तुस्थिती मांडली. सातारा आणि कोल्हापूर गॅझेटच्या अंमलबजावणीमध्ये काही तांत्रिक व कायदेशीर मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यामुळे सरकारने हे संपूर्ण प्रकरण राज्याच्या महाधिवक्त्यांकडे कायदेशीर अभिप्रायासाठी पाठवले आहे.

"हैदराबाद गॅझेटचे मूळ प्रकरण सध्या उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना जर सरकारने घाईगडबडीत नवीन गॅझेट लागू केले आणि न्यायालयाने त्याला स्थगिती दिली, तर मोठा कायदेशीर पेच निर्माण होईल. त्यामुळे ॲडव्होकेट जनरल यांच्याकडून जसा कायदेशीर सल्ला प्राप्त होईल, त्यानुसारच शासन पुढील ठोस पावले उचलेल," असे त्यांनी स्पष्ट केले. या प्रक्रियेला थोडा वेळ लागणार असल्याने जरांगे यांनी सरकारला पुरेसा वेळ द्यावा, अशी विनंती त्यांनी केली.

## मनोज जरांगेंच्या मुंबईतील आंदोलनाविरोधात...

दावा करते.

२०२५ मध्ये ही या संस्थेकडून मराठा आरक्षाणाबाबत होणाऱ्या आंदोलनाचा विरोध करत न्यायालयात दाद मागण्यात आली होती. एमी फाऊंडेशनने नुकत्याच केलेल्या याचिकेत मुंबई शहरात, गणपती उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो, असं म्हटलं. या स्थितीत या आंदोलनाचा परवानगी मिळाल्यास मागील वर्षी झालेल्या आंदोलना प्रमाणे सार्वजनिक मार्ग आणि सार्वजनिक जागा बंद होऊ शकतात, असं करण्याचा कोणताही अधिकार आंदोलकांना नाही, ज्यामुळे सर्वसामान्य जनतेला गैरसोय होईल, असं याचिकाकर्त्यांनी म्हटलं आहे.

# *तुमच्या सूचनेतून बदलणार भरती परीक्षेची दिशा*

## विद्यार्थी, स्पर्धा परीक्षा क्लास चालक-मालक, शिक्षकांनी २१ सप्टेंबरच्या बैठकीत सहभागी व्हावे; सहआयुक्त मंजूषा मिसकर यांच्या सूचना

छत्रपती संभाजीनगर दि.१६ (प्रतिनिधी)- भरती परीक्षा पद्धतीतील सुधारणा अधिक परिणामकारक करण्यासाठी विद्यार्थ्यांसह स्पर्धा परीक्षा क्लास चालक-मालक, शिक्षक, शैक्षणिक संस्था व संबंधित घटकांनी आपल्या सूचना व अनुभव मांडावेत. २१ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता छत्रपती संभाजीनगर येथील स्मार्ट सिटी कार्यालयात होणाऱ्या बैठकीत जास्तीत जास्त संबंधितांनी सहभागी व्हावे, असे आवाहन सहआयुक्त मंजूषा मिसकर यांनी केले.

याअनुषंगाने आज विभागीय आयुक्त कार्यालयात सहआयुक्त मंजूषा मिसकर यांनी विभागातील आठही जिल्ह्यांतील टास्क फोर्सचे नोडल अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांची दूरदृश्य प्रणालीद्वारे बैठक घेतली. या बैठकीस विभागीय माहिती कार्यालयाचे माहिती उपसंचालक प्रवीण टाके उपस्थित होते. बैठकीत प्राप्त सूचना व अभिप्रायांचे वर्गीकरण, संबंधितांना भेटीसाठी वेळ देणे आणि २१ सप्टेंबरच्या बैठकीसाठी आवश्यक व्यवस्थेबाबत सूचना देण्यात आल्या.

छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी, धाराशिव, लातूर, नांदेड व हिंगोली या आठ जिल्ह्यांतील विद्यार्थी, परीक्षार्थी, पालक, शिक्षक, स्पर्धा परीक्षा क्लास चालक-मालक, अभ्यासिका चालक व शैक्षणिक संस्थांनी भरती परीक्षेचा प्रत्यक्ष अनुभव लक्षात घेऊन ठोस सूचना द्याव्यात, असे मिसकर यांनी सांगितले.

१८ सप्टेंबर रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आठही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांत विशेष कक्ष कार्यरत राहणार आहेत. नागरिकांना या कक्षात सूचना, शिफारशी, हरकती व निवेदने सादर करता येतील. प्रत्यक्ष उपस्थित राहता न येणाऱ्यांनी csn-examreformstaskforce@maharashtra.gov.in (सीएसएन-एग्झाम रिफॉर्म्स टास्क फोर्स ॲट महाराष्ट्र डॉट जीओव्ही डॉट इन) या ई-मेलवर अभिप्राय पाठवावा.

प्राप्त ई-मेल व निवेदनांचे १७ सप्टेंबरपर्यंत वर्गीकरण करून १८ व १९ सप्टेंबर रोजी संबंधितांना भेटीसाठी वेळ देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहण्याची शक्यता लक्षात घेऊन स्मार्ट सिटी कार्यालयात नोंदणी, टोकन, गटनिहाय प्रवेश, आसन व्यवस्था, पिण्याचे पाणी, चहापान व सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन करण्याच्या सूचनाही मिसकर यांनी दिल्या. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून निकालापर्यंतची प्रक्रिया, प्रश्नपत्रिकेची सुरक्षितता, परीक्षा केंद्र व्यवस्थापन, डिजिटल व बायोमेट्रिक प्रणाली, सीसीटीव्ही, मूल्यांकन, तक्रार निवारण तसेच पेपरफुटी व गैरप्रकारांना प्रतिबंध याबाबतही सूचना अपेक्षित आहेत. भरती परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा आणि परीक्षा क्षेत्रातील जाणकारांचा प्रत्यक्ष अनुभव सुधारणा प्रक्रियेत महत्त्वाचा असल्याने २१ सप्टेंबर रोजी स्मार्ट सिटी कार्यालयात होणाऱ्या बैठकीस जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आपल्या सूचना मांडाव्यात, असे आवाहन सहआयुक्त मंजूषा मिसकर यांनी केले.


MAHAGENCO — Maharashtra State Power Generation Co. Ltd. | एनटीपीसी NTPC

**STPL's NOTICE FOR INVITING TENDER No. N-11/2026-27**

Sinnar Thermal Power Limited (STPL)- A Joint Venture Company of MAHAGENCO and NTPC Ltd., invites offline bid offers from reputed and experienced bidders to participate in the competitive bidding process for the following tender.

| SR. No. | TENDER NO. | TENDER SPECIFICATION | COST OF EACH TENDER RS. | EMD RS. | SALE PERIOD FROM | SUBMISSION & OPENING DATE |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | T-18 / 2026-27 | Procurement of seamless pipes for HCSD ADP line size 175NB 12.70 mm thick, ASTM A106Gr B Seamless, CS pipe during revival of Unit-1&2 of STPL, Sinnar | Rs.2655/- | Rs 2,00,000/- | 17/09/2026 To 07/10/2026 | 08/10/2026 & 08/10/2026 |
| 2 | T-19 / 2026-27 | Design, Engineering, Erection, commissioning for work of Revival/ revamping of CHP-1 of Nashik TPS Eklahare with capacity enhancement to 500 TPH for Coal Unloading & Transportation to Sinnar TPL excluding Wagon Tippler System. | Rs.9293/- | Rs 20,00,000/- | 17/09/2026 To 07/10/2026 | 08/10/2026 & 08/10/2026 |
| 3 | T-20 / 2026-27 | The Life enhancement of induced draught cooling tower by Protective Coatings & Allied Work for Unit-1 at Sinnar TPL (Package-A) | Rs.2655/- | Rs 5,00,000/- | 17/09/2026 To 07/10/2026 | 08/10/2026 & 08/10/2026 |
| 4 | T-21 / 2026-27 | Construction of Internal Plant PQC Road & Culvert (PC&BC) for Coal Unloading / Stacking of Coal Yard, CHP Area at Sinnar TPL. | Rs.10,620/- | Rs 20,00,000/- | 17/09/2026 To 07/10/2026 | 08/10/2026 & 08/10/2026 |

Sealed offline tender bids are hereby invited from eligible and interested bidders for the above mentioned work. The tender documents will be available in offline mode during office hours.

Interested bidders may collect the documents from STPL office Add. - Plot No.-A-1/1, Musalgaon and Gulwanch village, IIIL, SEZ, Taluka Sinnar, Dist. Nashik-422112

**For any query Contact No.:** 9960844829 / 9650992373

**Email:** cnmdept@sinnartpl.in / ceo@sinnartpl.in

**Sd/-**
**Chief Executive Officer, STPL, Sinnar**